
‘दिल्ली-मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार’

अशी घोषणा देणाऱ्या

# मेंढा (लेखा)

## गावसमाजाची थोडक्यात ओळख



देवाजी तोफा

मोहन हिराबाई हिरालाल

'दिल्ली, मुंबईत आमचे सरकार !

आमच्या गावात आम्हीच सरकार !!'

अशी घोषणा देणाऱ्या

# मेंढा (लेखा)

## गावसमाजाची थोडक्यात ओळख

देवाजी नवलू तोफा

मोहन हिराबाई हिरालाल

वृक्षमित्र

चंद्रपूर / गडचिरोली

❖ प्रकाशक :
मोहन हिराबाई हिरालाल
संयोजक, 'वृक्षमित्र'
चिद्दरवार हॉस्पिटलजवळ
शेंडे प्लॉट, रामनगर,
चंद्रपूर - ४४२४०१

दूरध्वनी : ०७१७२-२५८१३४
मोबाईल : ९४२२८३५२३४
वेबसाईट : www.vrikshmitra.org
ई-मेल : vriksha_cha@sancharnet.in

❖ सहयोग राशी : १० रु.

❖ या पुस्तिकेतील कोणताही मजकूर पूर्वपरवानगीशिवाय उद्धृत करता येईल. त्याचा उपयोग केल्याची माहिती कळवल्यास व मुद्रित सामग्रीची प्रत पाठवल्यास आभारी राहू.

❖ मुखपृष्ठ : प्रवीण बिसणे

❖ मुद्रक :
रणजित देसाई
परंधाम मुद्रणालय
पवनार - ४४२ १११
(जि. वर्धा)

## अनुक्रम :


- प्रास्ताविक ---------------------------------- ४
- मेंढा (लेखा) : लोकशक्तीची पावले
  *मोहन हिराबाई हिरालाल* ------------------------------८
- विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' आणि मेंढा गावाचा
  स्वराज्याचा शोध
  *मोहन हिराबाई हिरालाल* ------------------------------ २०
- मेंढा (लेखा) गावाबाबत सामान्यतः
  विचारले जाणारे प्रश्न व त्यांना उत्तरे
  *देवाजी नवलू तोफा* ------------------------------ ३२
- मेंढा (लेखा) पासून काय शिकाल
  आणि शिकून काय कराल ?
  *देवाजी नवलू तोफा* ------------------------------ ६१

# प्रास्ताविक

जग आज अन्यायामुळे, उत्पीडनामुळे, आणि शोषणामुळे त्रस्त आहे. सत्तेच्या कचाट्यात जगाचा श्वास गुदमरून राहिला आहे. युद्धे, दहशतवाद आणि शस्त्रास्त्रांच्या अभिशापाने ते त्रासून गेले आहे. विज्ञान सत्ता-संपत्ती-स्वार्थ यांच्या हातात विकले गेले आहे.

एका बाजूला आर्थिक विकासाचा दर वाढतो आहे. काहींची श्रीमंतीही वाढते आहे. पण दुसरीकडे श्रीमंत व गरीबांतील दरी व बेरोजगारीही वाढते आहे. तथाकथित विकासाच्या आंधळ्या स्पर्धेत नैसर्गिक संसाधनांची अमर्याद लूट होते आहे. सत्ता, नफा व उपभोगाच्या लोभापायी जीवनाला आधारभूत संसाधनांची प्रचंड हानी होऊन जीवनच नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. आपल्या युगाच्या या संकटातून सुटण्यासाठी मानवी प्रयास आवश्यक आहेत.


वाळूच्या कणासारख्या सुट्या सुट्या मानवांनी समर्पित केलेली सत्ता एकवटून बनलेली सत्ताकेंद्रे – मग ती कोणत्याही विचारधारेची, पक्षाची असोत – मानवसमाजाला या संकटातून सोडवू शकणार नाहीत, हे आतापर्यंतच्या अनुभवावरून स्पष्ट झाले आहे. दंडशक्ती किंवा शस्त्रशक्ती नव्हे, तर लोकशक्ती हाच पर्याय आता उरला आहे. सर्वांच्या हिताची इच्छा बाळगणाऱ्या समाजातच लोकशक्तीचा उगम शक्य आहे. सर्वांचे हित जपायचे तर 'बहुमताने निर्णय' सारख्या सूक्ष्म हिंसेसह 'सर्व प्रकारच्या' हिंसेचा त्याग स्वनिर्णयाने करावा लागेल. हे पटत असले तरी लगेच शंका येते की हे शक्य आहे काय? टीका करणारेही 'हे निसर्ग-नियमांच्या विरुद्ध आहे' असे ठोकून देऊन शंकेला अधिक बळकट करतात. आपल्या आजूबाजूच्या समाजात याचा अनुभव न आल्याने अशी खात्रीच वाटायला लागते की 'गावसमाजाचा निर्णय सर्वसहमतीने' हे अशक्य असून 'अहिंसा' ही निसर्ग-नियमाच्या विरोधीच आहे. पण दुसरीकडे, बहुमताच्या रेट्याने व हिंसेच्या मार्गाने या युग-संकटातून सुटका होण्याऐवजी ते संकट अधिक वाढतच चालले आहे हे सुद्धा कळते. ही कोंडी फोडण्याचे युगकार्य मेंढा (लेखा)

नावाच्या लहानशा गावसमाजाने अजाणतेपणी केले आहे. या गावसमाज-प्रक्रियेतील अनुभवावरून आज आपण खात्रीने म्हणू शकतो की 'गावसमाजाचा निर्णय सर्वसहमतीने' व 'हिंसेचा प्रतिकार अहिंसेने' शक्य आहे. हे शक्य आहे याचाच अर्थ, लोकशक्ती हा पर्याय शक्य आहे.

लोकशक्तीचा हा पर्याय शक्य होण्यासाठी गावसमाज पातळीपासून तर जगाच्या पातळीपर्यंतच्या दोन रचना आवश्यक आहेत.


१. राज्य-रचना : काय नको, काय पाहिजे (बघा आकृती क्र. १) –

आकृती क्र. १



**२. ज्ञान-रचना :** निर्णयाच्या ताणापासून मुक्त अशी गावसमाज-पातळी ते जगापर्यंतची, ज्यांना आवड आहे अशा मानवांची, सतत ज्ञान-प्रक्रिया. (निर्णय व कृतीशी ज्ञानाचा संबंध लक्षात घेण्यासाठी बघा आकृती क्र. २)

**आकृती क्र. २**




## गावसमाजाची व्याख्या

गाव, मोहल्ला, टोला, पाडा, वाडी, तांडा, हाऊसिंग सोसायटी किंवा मोठी चाळ, जिथे लोक निवास करून राहतात व आपले दैनंदिन जीवन जगताना सर्वांशी संबंधित निर्णय सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांच्या बैठकीत चर्चा करून सर्वसहमतीनेच घेतात, असा मानवी समाजाचा आधारभूत महत्तम सहभागी राजकीय-आर्थिक-सामाजिक घटक (युनिट) म्हणजे गाव-समाज.


असा गाव-समाज खालील तीन निकषांनी जास्त स्पष्ट होतो –

१) लोकसंख्या – ३०० ते ५०० व्यक्ती

२) निवासस्थानांतील अंतर – फक्त आवाज देताच लोक विचारविनिमय करायला वारंवार जमू शकतील इतके.

३) निर्णय – गाव-समाजाशी संबंधित सर्व निर्णय आम्ही ग्रामसभेत सर्व-सहमतीनेच घेऊ असा स्वयंनिर्णय.

आकृती क्र. ३




मेंढा (लेखा) ची सर्वांत महत्त्वाची ओळख, तो असा गावसमाज आहे ही आहे. फक्त आहे नाही, तर किमान १९८७ पासून बाहेरच्या व आतल्या अनेक संकटांवर मात करून अजून टिकून असलेला प्रगतिशील असा गावसमाज आहे. घोर अंधःकारात आशेची ही पणतीच म्हणावी लागेल. या पणतीने आणखी गावसमाजांच्या-मोहल्लासमाजांच्या पणत्या उजळोत, हीच सदिच्छा !

# मेंढा (लेखा) : लोकशक्तीची पावले

– मोहन हिराबाई हिरालाल

संस्था या मूलतः समाजाच्या वागणुकीचे नियमन करणाऱ्या रचना असतात. त्या लोकांची मूल्ये व संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. संस्था नियमन केल्या जात असलेल्या सामाजिक अवकाशाचे एकक रचतात, ज्यात लोक काम करतात आणि इतर संस्थांच्या सत्ताक्षेत्रांतर्गत जोडलेलेही असतात.

अतिप्राचीन काळापासून व्यक्ती व समाज यांचे सह-अस्तित्व असल्याचे दिसते. प्रत्येक व्यक्ती निसर्गतःच स्वतंत्र, ज्ञानक्षम, जैविकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण व वेगळे आत्मभान असलेली असली तरी तिचे अस्तित्व समाजाची एक सदस्य घटक म्हणूनच असते. दुसऱ्या बाजूने पाहिल्यास अशा अनेक व्यक्तींचा मिळूनच समाज बनलेला असतो आणि दोघेही एकाच वेळेला एकमेकांना प्रभावित करीत असतात. प्राचीन काळापासून माणूस व त्याच्या समाजाच्या खालील दोन आवश्यकता सातत्याने राहिल्या असल्याचे दिसते : १) व्यक्तीवर योग्य नियंत्रण ठेवू शकेल अशा सामाजिक रचनेची आवश्यकता; २) अशी योग्य सामाजिक रचना घडवू शकतील अशा व्यक्तींची आवश्यकता. अर्थातच, 'योग्य' या शब्दाचा आशय व आवाका व्यक्ती, काळ, समाज व संस्कृतीप्रमाणे बदलत राहिला आहे.

व्यक्तींप्रमाणेच समाजांचेही स्वतःचे स्वभाव, गुण व दोष, संस्कृती आणि विकृती असतात. आपल्या जैविक पर्यावरणात निसर्गानेच माणसाला इतरांच्या तुलनेत सर्वांत जास्त निवडीचे स्वातंत्र्य दिले आहे. हे स्वातंत्र्य वापरून त्याने आत्मघाताच्या दिशेने वाटचाल केल्याची अनेक उदाहरणे मानवी इतिहासात आढळतात. त्याच वेळेस आपल्या व दुसऱ्याच्या अनुभवापासून शिकण्याची व झालेल्या चुका दुरुस्त करून योग्य निर्णय घेण्याची प्रचंड क्षमता त्याच्यात आहे, असेही दिसते.

आपण निसर्गापेक्षा वेगळे असून त्यावर मात करून विजय मिळवू शकतो, असा अहंकार बाळगण्याची मोठी चूक मधल्या कालखंडात माणसाने केली आहे. ती चूक लक्षात यायला माणसाला मोठी किंमत चुकवावी लागली. अजून चुकवावी लागत आहे. माणूस हा निसर्गाचाच एक अविभाज्य परस्परावलंबी घटक आहे हे

समजून व स्वीकारून चुका दुरुस्त करण्याचा कालखंड आता सुरू झाला आहे. माणसाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात लांब उडी मारली असली तरी तो स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाच्या क्षेत्रात अजूनही बराच मागे आहे. भौतिक समृद्धी व उपलब्धतेच्या बेटांसोबतच आर्थिक विषमता, गरीबी, सामाजिक अन्याय, असुरक्षितता, निराशा व हिंसेचा महासागरही वाढत आहे. पर्यावरणीय असंतुलनामुळे माणसाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे.

राज्यव्यवस्थेने टोळी-जमातीपासून सुरुवात करून राष्ट्रराज्य (नेशन-स्टेट)चा टप्पा आता ओलांडला असून उपखंडीय राष्ट्रराज्याच्या दिशेने तिची वाटचाल सुरू आहे. विचारधारा भांडवली समाजवादी, साम्यवादी किंवा आणखी काही असली तरी या सर्व केंद्रित प्रातिनिधिक राज्यव्यवस्थांचा आधारभूत घटक व्यक्ती हाच आहे. वाळूच्या कणासारख्या सुट्या सुट्या व्यक्ती व त्यांच्यावर त्यांनी बहुमताने निवडून दिलेले प्रतिनिधी अशीच ही रचना आहे. व्यक्ती आपली नैसर्गिक राज्यसत्ता कुठल्या तरी प्रातिनिधिक सत्ताकेंद्राला समर्पित करून स्वत: दुबळ्या बनतात; तर स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, समृद्धी, सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था आणि शांतीच्या आश्वासन-पूर्तीसंदर्भात ही प्रातिनिधिक सत्ताकेंद्रे व्यक्तींनी समर्पित केलेली सर्व सत्ता ग्रहण करूनही दुबळीच ठरतात.

मग कुठल्या प्रकारची राज्यव्यवस्था हवी? कोणत्याही प्रकारची हुकूमशाही किंवा एकाधिकारशाही हा पर्याय नाही, हे तर नक्कीच. कशी व्यवस्था हवी याचे सकारात्मक वर्णन महात्मा गांधींचे पट्टशिष्य आचार्य विनोबा भावे यांनी त्यांच्या 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तिकेत केले आहे. ते त्याला 'सर्वायतन' असे म्हणतात. सर्वसहमतीने निर्णय घेणारा गावसमाज हा त्याचा आधारभूत घटक आहे. दोष केवळ व्यक्तींचेच नसतात, तर ते रचनांचेही असतात; केवळ व्यक्ती किंवा पक्ष बदलून रचनांचे दोष दूर होत नाहीत, हा व्यवस्थापनशास्त्रातील सिद्धांतच विनोबा राज्यव्यवस्थेसंदर्भात इथे मांडताना दिसतात. गावसमाज तोच असला, त्याच व्यक्ती सदस्य असल्या तरी जेव्हा ते सर्वसहमतीने निर्णय घेण्याचा निर्णय सर्वसहमतीनेच घेतात तेव्हा वेगळी रचना अस्तित्वात येते, जी खऱ्या अर्थाने मजबूत असते.

विनोबांनी सर्वसहमतीची गोष्ट मांडली खरी, पण त्यासोबत हेही लिहून ठेवले की, असे सर्वसहमतीने निर्णय घेणारे गाव काही त्यांनी बघितलेले नाही. महात्मा

गांधी व विनोबांना मानणाऱ्यांपैकी बहुसंख्यांनीसुद्धा या सैद्धांतिक मांडणीला 'युटोपिया' संबोधून अशक्य ठरविले व बहुमताच्या प्रातिनिधिक, केंद्रित लोकशाहीचीच कास धरली. व्यक्तीला आधार मानून बहुमताने निर्णय घेणारी प्रातिनिधिक रचना एकपक्षीय साम्यवाद असो की बहुपक्षीय लोकशाहीचा भांडवलशाही-समाजवाद असो, दोन्ही प्रयोगांचे अनुभव लक्षात घेता गांधी-विनोबा फक्त भारतातच नव्हे तर जागतिक संदर्भातही अधिकाधिक प्रासंगिक होत चालले आहेत असे दिसते.

मूल्ये, जीवनपद्धती व रचना यांतील असंतुलन सामाजिक अन्याय, पर्यावरणीय असमतोल, असुरक्षितता व विनाशाकडेच घेऊन जाईल; तर यांतील संतुलनच सामाजिक न्याय, पर्यावरण-समतोल, सुरक्षितता व विकासाकडे घेऊन जाऊ शकेल. असे संतुलन प्राप्त करण्याची ज़बाबदारी व्यक्ती व समाज दोघांचीही सारखीच आहे. आज माणूस अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्य व उपभोगवादामागे धावत आहे. मोठी शोकांतिका आहे की, बहुसंख्य वंचित व शोषितांची जीवनसृष्टी व स्वप्नेसुद्धा तीच आहेत. तथाकथित आधुनिक सभ्यतेने सर्वांना भुरळ घातली आहे. प्रत्येक व्यक्ती गुण-दोषांनी युक्त आहे. दोषांवर प्रभावी नियंत्रण ठेवून गुणांना वाव देणारी रचना हवी. केवळ सर्वसहमतीने निर्णय घेणारे लहान गाव/मोहल्ला हे काम परिणामकारकरीत्या करू शकेल. विचार केला तर हे पटतेही; पण लगेच मनात शंका येते – काय हे शक्य आहे? व्यक्तीनंतर नवरा-बायको हे सर्वांत जवळचे संबंध असलेले एकक (युनिट); त्यांच्यातही सर्वसहमती होताना दिसत नाही. आई-वडील, मुले-मुली अशा रक्तसंबंधाने बांधलेल्या कुटुंबामध्येही सर्वसहमती आढळत नाही. मग गावसमाजात ती कशी शक्य असेल? मग जे काही लोक म्हणतात, 'सर्वसहमती ही निसर्ग-नियमांच्याच विरोधी असल्याने अशक्य आहे, फक्त विरोधातूनच विकास होत असतो', तेच खरे वाटायला लागते. पण लगेच असाही विचार मनात येतो की, फक्त कुणी म्हणते म्हणून का ते आपण मानावे? आपल्या परिसरात एक तरी गाव किंवा मोहल्ला सर्वसहमतीने निर्णय घेणारा आहे की नाही याचा आपल्या परीने शोध घ्यावा. या दृष्टीनेच आम्ही 'जंगल व लोक' या विषयावर धानोरा तालुक्यातील २२ गावांसोबत सहभागी पद्धतीने अभ्यास व कृती संशोधन करण्याची योजना १९८७ मध्ये आखली. या प्रकल्पाचे एक उद्दिष्टच मुळी सर्वसहमतीने निर्णय घेणारे गाव असते काय, हे

शोधणे हे होते. बावीस गावांसोबत त्यांच्या सहमतीने अभ्यास सुरू झाला आणि एक वर्षातच कळले की या २२ पैकी 'मेंढा (लेखा)' हे असे गाव आहे. पुढील सहा महिने आम्ही हे खरेच आहे काय याची कसून तपासणी केली. मग खात्री पटली – हो, मेंढा (लेखा) हे असे गाव आहे जिथे गावाशी संबंधित प्रत्येक निर्णय गावाच्या ग्रामसभेत सर्वसहमतीनेच घेतला जातो. या गावाने 'सर्वसहमतीने निर्णय हा युटोपिया नाही' हे सिद्ध करून राज्य-समाजशास्त्रात मोलाची भर टाकली आहे.

x x x

मेंढा (लेखा) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात वसलेले गोंड आदिवासींचे मध्य भारतातील इतर गावांसारखेच एक लहानसे गाव आहे. एकूण ८४ घरे व ४३४ लोकसंख्या (मार्च २००७) असलेले हे गाव गडचिरोली-धानोरा रस्त्यावर धानोरा या तालुक्याच्या गावापासून फक्त ३ कि.मी. अंतरावर व जिल्ह्याच्या ठिकाणापासून ३० कि.मी. वर आहे. अनेक वर्षांपासून बाहेरील जगाशी सतत सहज संपर्कात असूनही हे गाव आपले वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण राखून आहे. काय या गावात लोकांचे आपापसात मतभेद व भांडणे नाहीत? मतभेद व भांडणेही आहेत. गावात आर्थिक विषमता नाही? ती सुद्धा आहे. काय गावात भूक, गरीबी आणि बेकारीची समस्या नाही? आहे. या गावातील लोक त्या भागातील राजकीय पुढारी, ठेकेदार, व्यापारी, शासकीय कर्मचारी आणि धार्मिक प्रमुखांच्या संपर्कात येत नाहीत काय? ते सर्वांच्या संपर्कात येतात. या गावातील लोक नाटक, डंडार, टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा बघत नाहीत काय? असेही नाही. मग काय फरक आहे इतर गावे आणि या गावात? वरील सर्व गोष्टी असूनही या गावाने स्वतः होऊन सर्वसहमतीने ठरविले आहे की गावाशी संबंधित सर्व निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीनेच घ्यायचे. गावाचा हा निर्णय हाच तो महत्त्वपूर्ण फरक.

गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची सभा म्हणजेच ग्रामसभा. गावपाटलाने एक आवाज दिला तरी ही ग्रामसभा भरू शकते. सर्वसाधारणपणे ५० टक्के उपस्थिती असते. जे ग्रामसभेत अनुपस्थित असतील त्यांनी ग्रामसभेचा निर्णय मान्य करायचा अशी सर्वमान्यता आहे. ऐकायचे सर्वांचे, पण करायचे तेच जे ग्रामसभा ठरवेल, असे ठरलेले आहे. ग्रामसभेत सर्व स्त्री-पुरुषांना आपले मत मांडण्याचा समान अधिकार आहे. निर्णय घेण्यासाठी ग्रामसभा व अभ्यास

करण्यासाठी अभ्यास मंडळ अशा गावाच्या दोन स्वतंत्र रचना आहेत. अभ्यास मंडळात फक्त चर्चा करायची, निर्णय घ्यायचा नाही, असेही ठरलेले आहे. अभ्यास मंडळ. या मंडळातील सहभाग पूर्णपणे ऐच्छिक आहे. अभ्यास मंडळात गावाबाहेरील व्यक्तीही सहभागी होऊ शकतात; पण ग्रामसभेत नव्हे.

अभ्यास मंडळातील चर्चेतून 'आमच्या गावात आम्हीच सरकार'ची अधिक स्पष्टता झाल्यावर या गावाने सर्वप्रथम आपल्यातील दोष काय याचा शोध सुरू केला. हक्कांची लढाई लढायची असेल तर आधी आपल्यातील दोष दूर करायला पाहिजेत याचे भान गावाला होते. फळे, फुले, पाने किंवा मधासाठी आपल्यातीलच काही लोक बुडापासून मोठमोठी झाडे सहज तोडून टाकतात, हे बरोबर नाही असे लक्षात येताच ग्रामसभेत त्यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यास आला की कोणीही असे केल्यास त्यास रु. १५० दंड ग्रामसभेला द्यावा लागेल. त्याची कडक अंमलबजावणीही सुरू झाली. गोंड जनजाती तशी पुरुषप्रधान. त्यामुळे सामूहिक निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग एक तर नसतोच किंवा असला तरी अत्यल्प असतो. ग्रामसभेत स्त्रियांचा सहभाग कसा वाढेल याकरिता विचारपूर्वक प्रयत्न करण्यात आले. ग्रामसभेत नीट चर्चा होऊन निर्णय होण्याआड येणारी प्रमुख समस्या होती दारूची. सर्वसहमतीने गावातील दारूपानावर ग्रामसभेचे संपूर्ण नियंत्रण स्थापित व्हायला गावाला एक वर्षाचा कालावधी लागला. पण सर्वसहमतीने निर्णय व्हावा याकरिता वाट पाहण्याचा आवश्यक तो धीर गावाजवळ होता. 'गोटूल' ही गोंड आदिवासींची अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी सांस्कृतिक रचना – जणू निरोगी उत्तम नागरिक तयार करणारी अनौपचारिक शाळाच. पण फक्त तरुण मुले-मुली तिथे एकत्रित येतात, म्हणून गैर-आदिवासी समाजाच्या विकृत टीकेला बळी पडून तथाकथित सुधारणेच्या नावाखाली स्वतःच लोकांनी गोटूल मोडून टाकले होते. अभ्यासातून लोकांच्या लक्षात आले की गोटूल हे आपल्या सांस्कृतिक-सामाजिक संघटनेचे केंद्रही होते. हे कळताच 'गोटूल'ची पुन्हा स्थापना करण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला.

गावकऱ्यांचा जंगल हा जगण्याचा मुख्य आधार. गावहद्दीतील एकूण जमिनीपैकी ९१ टक्के जमीन लोकांचे परंपरागत निस्तार हक्क असलेली वनराई. सामूहिक मालकीच्या किंवा सरकारी जमिनीमधून जगण्याकरिता आवश्यक अन्न, फळ, फूल, कंद, मूळ, पाने, जळण, शेती व घरासाठी इमारती लाकूड, कुंपण,

मांडव इ. साठी लाकूड तसेच बांबू, गवत इ. घेण्याचे जे परंपरागत अधिकार असत/आहेत, त्यांना 'निस्तार हक्क' असे म्हणतात. हा भूभाग १९६० पूर्वी महाराष्ट्रात सम्मिलित होण्याअगोदर सी.पी.अँड बेरारमध्ये होता. १९५० मध्ये जमीनदाऱ्या नष्ट झाल्यावर राज्य सरकारने निस्तार चौकशी करून प्रत्येक गावाचे वेगवेगळे निस्तार पत्रक तयार केले व त्यांना पटवारी रेकॉर्डमधील राजस्व कागदपत्राचा दर्जा दिला. गावहद्दीतील संपूर्ण जमिनीवर गावकऱ्यांचे निस्तार हक्क होते. पण पुढे या वनांचे व्यवस्थापन वन विभागाकडे देण्यात आले व त्यांनी सांगायला सुरुवात केली की तुमचे निस्तार हक्क नष्ट झालेत. त्यातून गार्ड व डफेदारांमार्फत वन विभागाच्या लुटीची अन्याय्य व्यवस्था उभी झाली. लोकांनीही हक्काची कास न धरता तात्पुरत्या सोयीसाठी तिच्यापुढे शरणागती पत्करली. अभ्यासातून लोकांनी या निस्तार हक्कांचाही शोध घेतला. कायद्याने निस्तार कायम आहे असे कळल्यावर अधिकृत कागदपत्रांच्या नकला मिळविण्यासाठी संघटित लढा दिला. गार्ड व पटवाऱ्याला एकत्रित बोलावून आपल्या निस्तार हक्काच्या जंगलाची प्रत्यक्ष सीमारेषा त्यांच्यासोबत फिरून जाणून घेतली व यापुढे निस्तारासाठी गार्डला धान्य, कोंबडे, बकरे किंवा पैसे इत्यादी न देण्याचा निर्णय घेतला. कुणी दिल्यास तितकीच वस्तू किंवा पैसे ग्रामसभेत जमा करावे लागतील, असा नियमही बनविला. हा ऐतिहासिक निर्णय गार्डला खास माणूस पाठवून कळविण्याची व्यवस्थाही करण्यात आली.

ग्रामसभेच्या माध्यमातून लोक गाव-पातळीवरील आपली राजकीय सत्ता आपल्या स्वतःच्या हातात कशी घेतात याचीही प्रचीती या प्रक्रियेत आली. 'सत्ता भीक मागून मिळत नाही, ती लोकांनी हिसकावून हातात घ्यावी लागते, किंवा आपली सत्ता दुसऱ्याला समर्पित न करता राखावी लागते', असे सिद्धांत खूप ऐकले-वाचले होते. पण लोक ते कसे करतात याचे दर्शन मेंढा (लेखा) गावात झाले. खूप चर्चा आणि विचारांती मेंढ्याच्या ग्रामसभेने आणखी एक ऐतिहासिक निर्णय घेतला : "गावाबाहेरील कोणालाही – मग ते केंद्र सरकार असो की राज्य सरकार, ठेकेदार असो की स्वयंसेवी संस्था – गावहद्दीत काहीही करावयाचे असेल तर तसे त्यांना ग्रामसभेच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. कुणी जबरदस्तीने तसे करण्याचा प्रयत्न केल्यास संपूर्ण गाव जाऊन शांततामय मार्गाने, 'चिपको' आंदोलनाच्या पद्धतीने, ते काम बंद पाडेल." ग्रामसभेचा हा निर्णय

फक्त घोषित करण्यात आला. ग्रामसभा ही गावाची सर्वोच्च लोकसभा असल्याने तिच्या निर्णयावर आणखी कुणाची परवानगी मागण्याचा प्रश्नच नव्हता. निर्णय घेणे त्यामानाने सोपे होते, पण त्यावर अंमलबजावणी करणे तितकेच कठीण. परीक्षेची घडी लवकर आली. गार्डने न विचारता सुरू केलेले जंगलातील विरळीकरणाचे (thinning) काम लोकांनी यशस्वीपणे बंद पाडले. पुढे सरपंच विरुद्ध गाव असा प्रसंग उभा झाला तेव्हाही दुसऱ्याला न मारता, शिव्याही न देता, स्वत: मरण्याची तयारी असलेल्या गाव-संघटनेने ग्रामसभेची पूर्वपरवानगी न घेता फोडलेली गिट्टी खुद्द सरपंचालाही नेऊ दिली नाही. सरपंचाला गावाने पदावर बसवले आहे, याची आठवण देऊन सरपंचापेक्षा गाव मोठे आहे याची जाणीव सरपंचाला करून दिली.

(गावाच्या गोटूलसाठी गावाने जो लढा दिला त्याची हकीगत 'विनोबांचे स्वराज्यशास्त्र आणि मेंढा गावाचा स्वराज्याचा शोध' या लेखात विस्ताराने दिली आहे.)

पेपर मिल या भागातील सर्वांत मोठी आर्थिक शक्ती. शासनाने मेंढा गावाच्या निस्तार हक्काच्या जंगलातीलही बांबू अत्यल्प दरात पेपर मिलला अनेक वर्षांच्या लीजवर दिलेला. १९९१ मध्ये लीजची मुदत संपली. ग्रामसभेने राज्य शासनाच्या मुख्यमंत्र्यांना लेखी कळविले की 'यापुढे आमच्या जंगलातील बांबू आम्हाला न विचारता पेपर मिलला देऊ नये. जबरदस्ती दिल्यास आम्ही तो कापू देणार नाही'. तरी शासनाने पेपर मिलला निस्तार वनातील बांबूची लीज दिली. पण लोकांनी 'चिपको' पद्धतीने आंदोलन करून गेली तीन वर्षे पेपर मिलला बांबू कापू दिलेला नाही. अनेक आर्थिक प्रलोभने व सशस्त्र दबावांना तोंड देत ग्रामसभा तीन वर्षे खंबीरपणे उभी राहिली. ही एकजूट तोडण्याकरीता पेपरमिलने तर साम-दाम-दंड-भेद – सर्व मार्गांनी प्रयत्न केलेच. वन विभागानेही सरपंचाच्या माध्यमातून गावाला पत्र पाठवून कळविले की शासनाने पेपरमिलला लीज दिली असतानाही बांबू तोडून नेऊ न दिल्यास तुमच्या विरोधात पोलिसात तक्रार देऊन कोर्टात कार्यवाही करण्यात येईल. त्यावर अभ्यास मंडळात सखोल चर्चा करून गावाने वन विभागाला ''आमच्यावर लवकर पोलीस व कोर्ट कार्यवाही करण्यात यावी'' असे उत्तर पाठवून दिले. अभ्यासातून गावाला हेही लक्षात आले की पेपरमिल वनात जाऊन ज्या पद्धतीने बांबू-कटाई करीत आहे त्यामुळे बांबू रांझ्या

नष्ट होऊन वनाचेही नुकसान होत आहे. त्यावर उपाय म्हणून गावाने मागणी केली की वनातच बांबूचे तुकडे करून बंडल्स बांधण्याची पेपरमिलची पद्धत बंद करण्यात यावी. निस्तारासाठी आवश्यक असा परिपक्व लांब बांबूच संयुक्त वनव्यवस्थापन समिती, मेंढा (लेखा) व वन विभाग यांनी संयुक्तपणे तोडून त्याचा डेपो गावहद्दीतच लावण्यात यावा. तिथून आधी शेतकरी, तसेच अन्य गावकरी व कारागीर यांना आवश्यक तो बांबू देऊन उरल्यास मगच तो पेपर मिलला द्यावा. तीन वर्षे सतत लढा दिल्यावर शासनाने गावाचे म्हणणे मान्य केले.

आदिवासींच्या विकासाच्या नावावर भरपूर पैसा येतो व खर्च होतो. पण तो प्रत्यक्ष लोकांपर्यंत मात्र पोहोचत नाही. या समस्येवरही अभ्यास करण्यात आला. 'आमच्या विकासासाठी आलेला पैसा सरळ ग्रामसभेला देण्यात यावा. गावात काम राबविण्याची जबाबदारी ग्रामसभा घेईल', असे ग्रामसभेने शासनाला कळविले. 'पैसा ग्रामपंचायतीला देता येतो, ग्रामसभेला नाही' असे उत्तर देण्यात आले. लोकांनी, ग्रामपंचायत म्हणजे गाव नाही, हे समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावर 'ग्रामसभेला कायद्याने मान्यता नाही' असे कारण पुढे करण्यात आले. लोकांनी विचारले, 'मग तुम्ही स्वयंसेवी संस्थांना कसे पैसे देता?' त्या संस्था रजिस्टर्ड आहेत, असे उत्तर मिळाल्यावर ग्रामसभेने संपूर्ण मेंढा गावच रजिस्टर्ड करून घ्यायचे ठरविले. संस्थेची घटना तयार करण्याचे काम दोन महिने सुरू होते. गोंडी भाषेतून मोहल्ल्यामोहल्ल्यात चर्चा सुरू होती. संस्थेचे नाव 'गाव नियोजन व विकास परिषद, मेंढा (लेखा)' असे ठरविण्यात आले. कार्यक्षेत्र फक्त मेंढा (लेखा) हे एकच गाव. सर्व निर्णय घेण्याचा अधिकार फक्त ग्रामसभेलाच असेल, ग्रामसभा ठरवून देईल तेवढेच काम कार्यकारी मंडळ करेल, ग्रामसभा दर पौर्णिमेला दुपारी १२ वा. गावाच्या गोटूलमध्ये होईल, ग्रामसभेची नोटीस काढण्यात येणार नाही, कोणीच कोणाला बोलावणार नाही, असेही ठरले. कार्यकारी मंडळाची पदे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष अशी न ठेवता प्रत्यक्ष कामाप्रमाणे ठरविण्यात आली. त्यांची कामेही वाटून देण्यात आली : संयोजक – ग्रामसभेच्या वतीने सही करणे व कागदपत्रे सांभाळणे, कारकून – लिखाणाचे काम, बँक खातेदार नं. १ व बँक खातेदार नं. २ – या दोघांच्या सहीने बँकेतील संस्थेचे खाते चालेल, पासबुकधारक – याच्याकडे बँकेचे पासबुक राहील व तो ते ग्रामसभा ठरवेल तेव्हाच देईल; खर्च करणारा – ग्रामसभा ठरवेल त्याप्रमाणे हा खर्च करेल; हिशेबनीस – हा हिशेब

लिहिण्याचे काम करेल; असे कार्यकारी मंडळ ठरले. सार्वजनिक संस्था नोंदणी अधिकाऱ्यांनी अशी घटना कायद्यात बसत नाही म्हणून प्रकरण निकालात काढले. 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर'च्या धर्तीवर 'कायदा दाखव किंवा नोंदणी कर' पद्धतीने बराच लढा दिल्यावर शेवटी एकदाची संस्थेची घटना न बदलविता नोंदणी झाली. पण तोपर्यंत गाव रजिस्टर्ड झाल्यास विकासाचा पैसा सरळ ग्रामसभेला देतो असे म्हणणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची बदली झाली होती !

बऱ्याच खटपटी आणि प्रयत्न केल्यानंतर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडून गावाच्या संस्थेला गावाचा पिण्याचे पाणी व सिंचनाचा प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता सोळा हजार रुपये अनुदान मिळाले आहे. तुम्ही 'आमच्या गावात आम्हीच सरकार' म्हणता, मग बाहेरच्या सरकारचा पैसा तुमच्या गावाच्या विकासासाठी कां मागता व घेता ? – अशी हेटाळणी करण्याचाही काही जणांनी प्रयत्न केला. त्यावर ''आमची घोषणा फक्त 'आमच्या गावात आम्हीच सरकार' अशी नाही, तर त्याआधी 'गावाबाहेर – म्हणजे दिल्ली-मुंबईत – आमचे सरकार' असा अर्धा भागही आहे; याचाच अर्थ, दिल्ली-मुंबईतील सरकार आमचेच असल्याने त्यांचा पैसाही आमचाच आहे. आमच्या हिश्शाचा पैसा आम्हाला मिळून त्याचा योग्य उपयोग होतो की नाही हे बघणे हेही आमचे कर्तव्यच आहे'', या शब्दांत लोकांनी त्यांना चोख उत्तर देऊन गप्प बसवले.

भ्रष्टाचारावरही ग्रामसभेने चोख उपाय शोधून काढले आहेत. त्यांनी ठरावच करून टाकला की, 'जो जितके पैसे मागेल तितके त्याला द्यायला काहीच हरकत नाही. फक्त त्या पैशाची पावती मात्र घेतली पाहिजे, एवढीच अट आहे. पावती न घेता कुणी पैसे दिले तर त्याने तितकेच पैसे ग्रामसभेतही जमा करावेत.' हे झाले पैसे द्यायचे असतात तेव्हा होणाऱ्या भ्रष्टाचाराबद्दल. जेव्हा पैसे घ्यायचे असतात तेव्हाही कर्मचारी निरनिराळ्या युक्त्या करून गावकऱ्यांना फसवतात. त्यावर त्यांचा उपाय आहे – एकएकट्याने जाऊन पैसे घ्यायचे नाहीत. ग्रामसभेत प्रथम कशासाठीचे पैसे आहेत, किती आहेत, मस्टर बरोबर आहे किंवा नाही इत्यादीची सविस्तर चौकशी व तपासणी झाल्यावरच पैशाचे वाटप करण्यात यावे असा दंडक आहे. एकदा दुष्काळ पडून पिकांचे नुकसान झाले म्हणून शासनातर्फे नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांना वाटण्याकरिता तालुक्याचे पर्यवेक्षक त्यांचे

मस्टर घेऊन गावात आले व लोकांनी लवकर लवकर पैसे घेऊन जावे म्हणून घाई करू लागले. लोकांनी त्यांना बसवून ठेवून गाव जमा केले. मस्टरची तपासणी झाली. तेव्हा लक्षात आले की त्यांनी डुप्लिकेट मस्टर तयार केले असून ते सही एकावर घेत आहेत व दुसऱ्या मस्टरवरील आकडा दाखवून पेमेंट करीत आहेत ! या प्रकारे ५०० च्या ऐवजी २५० व ४०० ऐवजी २०० असे वाटप करणे सुरू होते. आता या भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे काय करायचे, यावर ग्रामसभेत चर्चा झाली. कृषी पर्यविक्षकांना दरदरून घाम फुटला. त्यांनी गावापुढे लोटांगणच घातले, माफी मागितली व आग्रह करू लागले, 'तुम्ही तुमच्या गावातील भांडण गावातच मिटवता. कोर्टात जात नाही. माझी चूक झाली. माझी वर तक्रार करू नका. ग्रामसभा जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे.' ग्रामसभेने त्यांना ५०० रुपये दंड ताबडतोब गावफंडात भरण्याची शिक्षा सुनावली व पुन्हा कुठेही असा भ्रष्टाचार करणार नाही अशी सर्वांसमक्ष शपथ घ्यायला लावली.

गावाने पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन अभ्यासाचा एक भाग म्हणून गावाला लागून असलेल्या लघु-पाणलोट क्षेत्रात एक हजारपेक्षा जास्त गलीप्लग बांधले असून त्यांच्यापासून काय फायदे होत आहेत याचे निरीक्षण व अभ्यास सुरू आहे. गावाची सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास योजना तयार करून तिची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एक जैविक घटक (बायो-युनिट) म्हणून गावाच्या जंगलाचा अभ्यास करण्यासाठी बाहेरील अभ्यासक मित्रांसोबत मेंढा (लेखा) जंगल अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली असून अभ्यासाचे काम सुरू आहे. गावाने आपल्या विकासाचे नियोजन स्वत:च करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत.

गावाच्या अठराशे हेक्टर जंगलाचे संरक्षण करण्याकरिता गावकरी स्वत:च आळीपाळीने जंगलात गस्त घालतात. महाराष्ट्र राज्य शासनाचा 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' हा कार्यक्रम उपयुक्त वाटून गावकऱ्यांनी वन विभागाच्या पाठीमागे लागून या गावाची निवड सदर कार्यक्रमासाठी करवून घेतली. ऑगस्ट १९९३ मध्ये गावातील सर्व घरे सदस्य असलेली 'वन संरक्षण समिती' स्थापन करण्यात आली.

गावात विरोधी पुढारीही आहे. ग्रामसभेत कोणताही मुद्दा चर्चेला आला की

हा त्याला विरोध करणार, हे पक्के ठरलेले आहे. अभ्यास मंडळात हा अजिबात सहभागी होत नाही, पण ग्रामसभेत मात्र त्याचेच म्हणणे सर्वांनी मान्य करावे असा त्याचा आग्रह असतो. गावकरीही त्याला, तो विरोध करतो म्हणून, शत्रू समजत नाहीत. उलट ते त्याला सगळ्यात जवळचा मित्र समजतात. ते म्हणतात, 'याच्यामुळेच आमचे काही चुकणार असेल तर ते आम्हाला कळते'. फक्त त्याने ग्रामसभेत येऊन बोलावे असा आग्रह मात्र असतो. इतर 'हो हो' करणारे होयबा एखादवेळेस नाही आलेत तरी चालतील, पण हा विरोधक सभेला आलाच पाहिजे असे त्यांचे म्हणणे असते. विरोधकालाही मित्र बनवणारी ही किमया फक्त सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया जिथे आहे तिथेच होऊ शकते. बहुमताच्या निर्णय-प्रक्रियेत हे अशक्यच आहे.

x x x

मेंढा (लेखा) हे एक लहानसे आदिवासी गाव अत्यंत विषम परिस्थितीतही एकाकी लढत देत खंबीरपणे, स्वाभिमानाने उभे आहे. अनेकदा अपयश पचवून, हळूहळू का होईना, स्वतःची ताकद वाढवीतच चालले आहे. दोष फक्त व्यक्तीचेच नसतात, ते रचना व कार्यपद्धतींचेही असतात. मेंढा (लेखा) ची जी ताकद आहे ती गावाशी संबंधित सर्व निर्णय सर्वसहमतीने ग्रामसभेतच घेणाऱ्या महत्तम सहभागी राजकीय-सामाजिक रचना व कार्यपद्धतीची आहे यात शंका नाही.

मेंढा हे संपूर्ण आदिवासींचेच गाव असल्याने काही बाहेरील लोक सोपा निष्कर्ष काढतात की, 'आदिवासींचा एकजिनसी (होमोजिनिअस) समाज असल्यामुळेच हे मेंढ्यात शक्य झाले आहे. जिथे असा समाज नाही तिथे हे शक्यच नाही. शहरात तर समाजच नसल्याने हे घडणे अशक्यच आहे.' संपूर्ण आदिवासी लोकवस्ती असलेले मेंढा (लेखा) हे काही एकच गाव नाही; अशी अनेक गावे आहेत. मग अशा सर्व गावांमध्ये असेच कां घडत नाही? याचाच अर्थ स्पष्ट आहे की मेंढ्यात फक्त आदिवासींचा एकजिनसी समाज आहे म्हणून असे घडलेले नाही. असे वागण्याची क्षमता विशिष्ट जाती, जमाती किंवा धर्म, शहरी किंवा ग्रामीण असणे, यामुळे येत नाही; तर ही सर्वांमध्ये असलेली मानवी क्षमताच आहे, जी कुठेही प्रकट होऊ शकते.

जशी देशात लोकसभा, राज्यात विधानसभा, तशीच गावात ग्रामसभा व मोहल्ला समिती आहे; पण अशी विधानसभा की जिचे मंत्रिमंडळ नाही, जिची निवडणूक होत नाही, जिचे अस्तित्व स्वयंसिद्ध आहे, जी स्वयंभू आहे. तिला कुणी बनविले नाही, त्यामुळे तिला कुणी मोडूसुद्धा शकत नाही. अशी ग्रामसभा व मोहल्ला समिती हेच राजकीय व सामाजिक सांगाड्याचे पायाभूत घटक (बेसिक युनिट) आहेत. अशी जिवंत ग्रामसभा किंवा मोहल्ला समिती एखादे लहान राजस्व गाव, टोला, पाडा, मोहल्ला किंवा वॉर्डाचीही असू शकेल. आजच्या पंचायत राजमधील ग्रामपंचायतींची ग्रामसभा म्हणजे वर वर्णन केलेली ग्रामसभा नव्हे.

स्व-निर्णयाने सक्रिय झालेल्या अशा ग्रामसभा व मोहल्ला समित्यांची संख्या जसजशी वाढेल व त्या सातत्यपूर्वक काम करतील तेव्हा गरजेनुसार त्यांच्या प्रातिनिधिक रचनाही उभ्या राहतील, अशी आशा करू या. पण जेव्हा केव्हा ग्रामसभा व मोहल्ला समित्या आधारभूत घटक असलेली प्रातिनिधिक रचना उभी राहील तेव्हा तिची ताकद व सौंदर्य काही औरच असेल एवढे मात्र निश्चित !

*(समाज-प्रबोधन पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर २००६ मधून साभार)*

# विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' आणि मेंढा गावाचा स्वराज्याचा शोध

**– मोहन हिराबाई हिरालाल**

'हिंद-स्वराज्य' ही छोटीशी पुस्तिका महात्मा गांधींनी १९०९ साली इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेला जात असताना जहाजावर लिहिली. इंग्लंडमध्ये भारताच्या स्वातंत्र्याबद्दल त्यांची अनेक भारतीयांशी चर्चा झाली. त्या पार्श्वभूमीवर आम जनतेचे खरे स्वराज्य कशात आहे याबद्दल आपली मते या पुस्तिकेत महात्मा गांधींनी मांडली आहेत. या पुस्तिकेतील प्रकरण ४, 'स्वराज्य म्हणजे काय?' व ५, 'इंग्लंडची स्थिती' या प्रकरणात व्यक्तींच्या प्रतिनिधींची, इंग्लंडच्या पार्लमेंटसारखी, सांसदीय लोकशाहीची राज्यव्यवस्था स्वतंत्र भारतात नको, अशी स्पष्ट नकारात्मक मांडणी त्यांनी केली आहे. पण मग कशी राज्यव्यवस्था पाहिजे? याची सकारात्मक स्पष्टता या पुस्तिकेत होत नाही. ते काम महात्मा गांधींचे शिष्योत्तम विनोबा यांनी पुढे १९४१ मध्ये नागपूर जेलमध्ये 'स्वराज्य-शास्त्र' हे पुस्तक लिहून पूर्ण केले. स्वराज्याच्या शोधातील 'हिंद-स्वराज्य' ही पहिली पायरी असेल, तर 'स्वराज्य-शास्त्र' ही दुसरी पायरी आहे असे म्हणावे लागेल.

व्यवस्था स्थापण्याचे स्वाभाविक तीन प्रकार होतील अशी मांडणी विनोबा करतात. ते तीन प्रकार असे – अ) कोणत्यातरी एखाद्या प्राज्ञ किंवा समर्थ पुरुषाने सर्वांची व्यवस्था पहावी, आ) अशा अनेक पुरुषांनी एकत्र होऊन सर्वांची व्यवस्था पहावी, आणि इ) सर्वांनी मिळून समान जबाबदारीने आपली व्यवस्था करून घ्यावी. ह्या तीन प्रकारच्या स्वाभाविक राज्यव्यवस्थेला एकायतन, अनेकायतन आणि सर्वायतन, अशी पारिभाषिक नावे त्यांनी दिली आहेत. स्वतंत्र भारतात सर्वायतन ही राज्यव्यवस्था पाहिजे असे सकारात्मक सूचन ते करतात, पण त्यासोबतच असेही नमूद करतात की *''सर्वायतन राज्यपद्धती आज कोठेच अस्तित्वात नाही. तो प्रयत्न गांधींचा आहे आणि ती स्थापित करण्याचे साधनही त्यांनी शोधून काढले आहे. त्या साधनाचा प्रयोग ते भारतात करू पाहत आहेत.*

(विनोबांनी वर फक्त 'पुरुष' हाच शब्द वापरला आहे. ही गोष्ट खटकणारी असून फक्त 'पुरुष' ऐवजी 'स्त्री-पुरुष' असा शब्द वापरल्यास तो दोष दूर होऊ शकतो. अर्थात् विनोबांना हेच अभिप्रेत असणार, यात शंका नाही.)

*''लोकशाही नाव धारण करणारी आणि 'मी सर्वायतन आहे' असे भासविणारी एक राज्यपद्धती आहे, जिचे युरोप व अमेरिका ह्या दोन खंडांत नाटक चालू आहे. पण हिंसेवर उभारलेली कोणतीही पद्धती, जरी ती डोक्यागणिक मत मोजण्याचे सोंग करीत असली तरी, सर्वायतन नव्हे.*

*''उलटपक्षी सर्वांनी मिळून स्वेच्छेने आणि बुद्धिपूर्वक आपल्यातील कोण्या एकाच्या अथवा अनेकांच्या हातात, तो एक अथवा ते अनेक रागद्वेषरहित, भूतहितत्पर, बुद्धिमान आणि कुशल आहे अथवा आहेत असे जाणून, सत्ता सोपविली तर ती सत्ता आकाराने एकायतन अथवा अनेकायतन भासली तरी ती अहिंसेवर उभारलेली असताना प्रकाराने सर्वायतन समजली पाहिजे.*

*''हिंदुस्थानातील जुने पंचायतीचे राज्य हे असा काहीसा अर्धा-कच्चा परंतु इमानदार प्रयत्न म्हणता येईल. परंतु तो प्रयत्न इतका अशास्त्रीय आहे की उल्लेख करून सोडून देण्यापलीकडे त्याचा आज आपल्याला उपयोग नाही.*

*''आजच्या घटकेला सर्वायतन पद्धती अस्तित्वात नाही, आणि ती स्थापावयाची उरलेली आहे एवढे म्हटले म्हणजे पुरे.''*

त्यानंतरच्या प्रकरणात स्पष्टतेसाठी बरीच चर्चा केल्यावर 'राज्य-पद्धतीचा आदर्श' या प्रकरणात आधी केलेल्या सर्व चर्चेचा सारांश म्हणून राज्यपद्धतीच्या कसोटीची काही तत्त्वे विनोबा नमूद करतात. ती अशी –

*(अ) सार्वराष्ट्रीय भ्रातृभाव.*

*(आ) राष्ट्रातील सर्वांचे ज्ञानपूर्वक, यथाशक्ती पण सहजस्फूर्त आणि हार्दिक सहकार्य.*

*(इ) समर्थ अल्पसंख्या आणि सर्वसामान्य बहुसंख्या ह्यांचे हितैक्य.*

*(ई) सर्वांच्या सर्वांगीण आणि समान विकासाची दृष्टी.*

*(उ) राज्यसत्तेचे व्यापकतम विभाजन.*

*(ऊ) अल्पतम शासन.*

*(ए) सुलभतम तंत्र.*

## थोडे सर्वसहमतीबद्दल

सर्वसहमती साधणे कठीण आहे. पण हेही निश्चित, की ते अशक्य नाही. एकदा का सर्वांनी 'सर्वसहमतीने पुढे जायचे' हे निश्चित केले की सर्वसहमतीसाठी जरूर ती मानसिकता तयार होते. दुसरं असं बघा, विरोधातील एखाद्या व्यक्तीचेही मत बरोबर आणि योग्य असू शकतं. प्रत्येक पर्यायात काही चांगलं, काही वाईट असतं, असू शकतं. बहुमत पूर्णतः दोषरहित असतं असा अट्टाहास चुकीचाच. चर्चेतून, अभ्यासातून, विचारांतून ऊहापोह साधला जातो; इतर दृष्टिकोन समजतात आणि त्यामागची भूमिकाही विशद होते. निर्णयप्रक्रियेतील हाच तर सर्वांत महत्त्वाचा भाग. अनेकदा सखोल विचार न होता, वेळेची सबब पुढे करून बहुमताचा रेटा राजकारणात, समाजात वापरला जाऊ शकतो.

काही जण विरोध करताहेत ते कां हे समजून घेणे आवश्यक असते. विषयावरील सर्व चर्चा ही प्रश्न सोडवण्यासाठी व सर्वांच्या भल्यासाठी, पर्याय शोधण्यासाठी असते, ही भावना असल्यावर विरोधासाठीचा विरोध गळून पडतो, विरोधाच्या कारणमीमांसेवर चर्चा होते, त्यावर मात करण्यासाठी पर्याय पुढे येतात. विचारांची सकारात्मक देवाणघेवाण होऊन संघभावना वाढीस लागते, पर्याय तावून-सुलाखून निघतात. कधी कधी तडजोड होते, 'आज तुमच्यासाठी आम्ही एक पाऊल मागे घेतो, उद्या आमच्यासाठीही तुम्हीही अशी वृत्ती ठेवालच' ही आशा व्यक्त केली जाते, समाजातील ऋणानुबंध दृढ होतात आणि एकी बळावते; कार्याला दिशा मिळून, संघभावनेने कार्य तडीस नेण्यात मग आडकाठ्या येत नाहीत. 'देरसे आये मगर दुरुस्त आये' हाच अनुभव आजवर या पद्धतीत आम्हाला जाणवला. निर्णय काही एकदाच घ्यायचे नसतात. परिस्थितीसुद्धा बदलत असते. आजच्या बहुमतातील घटक उद्या बहुमतात असतीलच याचा काय भरवसा? त्यामुळे सर्वांना सामावून घेण्याची, कायम स्वरूपाची शक्यता सर्वसहमतीच्या पद्धतीनेच साधता येऊ शकते. त्या पद्धतीतच प्रत्येकाच्या स्वार्थाचे रक्षण करण्याची सोय आहे हे लक्षात आल्यावर ही पद्धत राबवणे वाटते तेवढे कठीण जाणार नाही.

**– मोहन हिराबाई हिरालाल**

*(विकासाच्या वाटा, लेखक सु. गो. तपस्वी, मध्ये उद्धृत चर्चेतून साभार)*

*(ऐ) कमीत कमी खर्च.*

*(ओ) कमीत कमी रखवाली.*

*(औ) सार्वत्रिक, अव्याहत आणि तटस्थ अथवा मुक्त ज्ञानप्रचार.*

याच क्रमात आणखी चर्चेनंतर साररूपाने विनोबा अशी मांडणी करतात की *"सर्वांचा कारभार सर्वांनी चालवावयाचा ह्याची स्थूल पद्धती त्या त्या समाजाच्या विकासाच्या अवस्थेवर अवलंबून राहील. परंतु ह्या सर्व पद्धतींमध्ये कमीत कमी चार वस्तू अनिवार्य असल्याच पाहिजेत–*

*(१) समर्थांचे सामर्थ्य जनसेवेला वाहिलेले असले पाहिजे.*

*(२) जनता संपूर्ण स्वावलंबी आणि परस्परसहकारी असली पाहिजे.*

*(३) नेहमीच्या सहकार्याचे आणि प्रासंगिक असहकाराचे अथवा प्रतिकाराचे अहिंसा हेच अधिष्ठान असले पाहिजे.*

*(४) सर्वांच्या प्रामाणिक परिश्रमाची किंमत (नैतिक आणि आर्थिक) समान असली पाहिजे."*

x x x

विनोबांनी मांडलेले तत्त्व – सर्वांचे स्वेच्छापूर्वक, बुद्धिपूर्वक, ज्ञानपूर्वक सहकार्य म्हणजे काय व ते कोणत्या रचनेत प्रकट होते ? याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास, जिथे पायाभूत समाज-पातळीवर सर्व प्रौढ स्त्री-पुरुष त्यांच्याशी संबंधित सर्व निर्णय सर्वसहमतीने स्वेच्छापूर्वक, बुद्धिपूर्वक, ज्ञानपूर्वक घेतात, अशा खऱ्या ग्रामसभेची रचना कल्पावी लागेल. अशा सर्वसहमतीच्या ग्रामसभेतच खरी लोकशक्ती प्रगट होऊ शकते.

गांधी-विनोबांच्या या मांडणीवर प्रमुख आक्षेप असा होता की हे स्वप्नरंजन (युटोपिया) आहे. प्रत्यक्षात असे घडूच शकत नाही. या आक्षेपाशिवाय कदाचित आणखीही काही कारणे असतील, पण गांधी-विनोबांचे नाव घेऊन काम करणाऱ्यांनी या दोन्ही पुस्तिकांकडे फारसे लक्ष दिले नाही असेच दिसते – या पुस्तिकांतील मांडणीला आधार बनवून त्यावर सातत्याने काम करणे तर दूरच राहिले.

लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी स्थापिलेल्या निर्दलीय युवकांच्या छात्र-युवा संघर्ष वाहिनी या संघटनेत झालेल्या चर्चांमधून मला स्पष्ट झाले की

व्यक्तींच्या प्रतिनिधींच्या केंद्रित राज्यसत्तेत – म्हणजेच दंडशक्तीमध्ये – अंगभूत ताकद नाही. लोकशक्तीमध्येच खरी अंगभूत ताकद आहे. ही लोकशक्ती कशी व कुठे प्रकट होते? याचा वैचारिक शोध घेण्याच्या प्रयत्नातून माझा 'हिंद-स्वराज्य' व 'स्वराज्य-शास्त्र' या पुस्तिकांशी परिचय झाला. सर्वसहमतीने निर्णय घेणाऱ्या गाव-समाजात खरी लोकशक्ती प्रकट होऊ शकते, हे कळले. पण असा गावसमाज कुठे आहे, त्याचा पत्ता मात्र पुस्तके व विचारवंत यांच्याकडून सापडेना. विचारांच्या पातळीवर 'हिंद-स्वराज्य' व 'स्वराज्य-शास्त्र' यांतील मांडणी पटत होती, पण आक्षेपाला खोटे ठरविण्याकरता सर्वसहमतीने निर्णय घेणारा गावसमाज सापडणे आवश्यक होते. माझ्या पुढील कामाची पद्धती काय असेल हे निश्चित होण्याकरता सुद्धा हा निवाडा होणे आवश्यक होते. म्हणून मी स्वत:च असे गाव आहे काय, त्याचा शोध घ्यावा असे ठरविले. गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात २२ गावांमध्ये 'जंगल व लोक' या विषयावर सहभागी पद्धतीने केलेल्या अभ्यासाच्या आखणीचे पहिले उद्दिष्ट, असा गावसमाज आहे काय हे शोधणे असे होते. आश्चर्य म्हणजे या २२ गावांतच एक सर्वसहमतीने निर्णय घेणारे गाव – मेंढा (लेखा) सापडले. आधी विश्वास बसेना. ६ महिने तपासणी करून खात्री करून घेतली. या गावाने सिद्ध केले की सर्वसहमतीची ग्रामसभा युटोपिया नाही; हे शक्य आहे.

१९८७ मध्ये जेव्हा या गावाची प्रथम ओळख झाली तेव्हा त्यांची सर्वसहमतीची ग्रामसभा म्हणजे सर्व पुरुषांचे स्वेच्छापूर्वक सहकार्य असलेली ग्रामसभा होती. हे सहकार्य पुरेसे ज्ञानपूर्वक नव्हते, व त्यात स्त्रियांचा सहभागही नव्हता. गावात सर्वसहमतीची ग्रामसभा असूनही म्हणावे तसे लोकशक्तीचे प्रकटीकरण दिसत नव्हते. कारण स्पष्टच होते. स्त्रियांचा सहभाग निर्णय-प्रक्रियेत नसल्यामुळे 'सर्वांचे' सहकार्य नव्हते. दुसरे कारण, ते सहकार्य पुरेसे 'ज्ञानपूर्वक' सुद्धा नव्हते. 'जंगल आणि लोक' या विषयाचा सहभागी पद्धतीने अभ्यास करताना लोकांमधील नैसर्गिक अभ्यास-क्षमतांचा व गावातील अनगढ अभ्यास-मंडळाचा परिचय झाला. आम्ही गावाबाहेरचे असल्यामुळे आमचा सहभाग गावाचे निर्णय घेणाऱ्या ग्रामसभेत होणे योग्य नाही, असे आम्हाला वाटले. आम्ही अभ्यास मंडळाच्या माध्यमातून ज्ञानप्रक्रियेवरच आपले लक्ष केंद्रित करायचे असे ठरविले. त्यातून आम्हाला 'ज्ञानपूर्वक सहकार्य' याची व त्यासाठी सर्वसहमतीच्या

ग्रामसभेच्या बरोबरीने आवश्यक असलेल्या गावाच्या अभ्यास-मंडळाच्या गरजेबाबतची स्पष्टता झाली. त्यातूनच वर (औ) मध्ये नमूद 'सार्वत्रिक, अव्याहत आणि तटस्थ अथवा मुक्त ज्ञानप्रचार' या तत्त्वाकरता आवश्यक 'अभ्यास-मंडळ' या रचना व कार्यपद्धतीचाही शोध लागला.

x x x

राज्यव्यवस्थेसाठी ज्या चार अनिवार्य वस्तू विनोबांनी सांगितल्या त्यांपैकी मेंढा (लेखा) मध्ये कोणत्या आहेत ?

१) मेंढा (लेखा) गावातील सर्वांत समर्थ (अधिक बुद्धिशाली आणि शक्तिशाली) व्यक्ती श्री. देवाजी तोफा व बाहेरून आलेले, पण काही वर्षे गावात वास्तव्य करून राहिलेले व नंतरही सतत संपर्कात असणारे श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांचे सामर्थ्य स्वेच्छापूर्वक, स्वभावत: व ज्ञानपूर्वक जनसेवेला वाहिलेले आहे.

आजच्या आपल्या लोकशाहीची इमारत सहभागी समाजाच्या मजबूत पायावर उभारलेली नसून ती वाळूच्या कणांसारख्या व्यक्तींच्या आधारावर बांधण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याऐवजी व्यक्तींच्या समूहांचे अभेद्य दगड बनवून ते पायाभरणीसाठी वापरले तर लोकशाही खऱ्या अर्थाने मजबूत पायावर उभारली जाईल. असे अभेद्य दगड म्हणजे गावसमाज; असे गावसमाज की जेथे कोणतेही निर्णय सर्वसहमतीने घेतले जातील. असे गावसमाज व त्यांचे प्रातिनिधिक गट त्यानंतर विधानसभा, लोकसभा ह्यासारख्या शासकीय स्तरांसाठी प्रतिनिधी नियुक्त करतील. मात्र, हे प्रतिनिधी स्वत:ची उमेदवारी निवडणुकीसाठी जाहीर करून बहुमताने विजयी झालेल्या व्यक्ती नसतील. गावसमाज आणि त्यांचे प्रातिनिधिक गट सर्वसहमतीने, योग्य व्यक्ती हेरून, ती जबाबदारी स्वीकारण्याची त्या व्यक्तींना विनंती करून त्यांच्या अनुमतीने त्या त्या व्यक्तींना प्रतिनिधी म्हणून नियुक्त करतील."

**—मोहन हिराबाई हिरालाल**

*(विकासाच्या वाटा, लेखक सु. गो. तपस्वी, मध्ये उद्धृत चर्चेतून साभार)*

२) जनता पूर्ण स्वावलंबी नव्हती, व आजही नाही. पण परस्पर-सहकारी मात्र होती व आजही आहे.

३) नेहमीच्या सहकार्याचे आणि प्रासंगिक असहकाराचे अथवा प्रतिकाराचे अधिष्ठान अहिंसाच आहे, याचे ज्ञान मेंढा (लेखा) च्या अभ्यास-मंडळाच्या प्रक्रियेतून ग्रामसभेला झाले आहे. त्यातून त्यांचा पराक्रम व ताकद, दोन्ही प्रकट झाल्याचे दिसून येते. याचे एक उदाहरण म्हणजे गोटूलची लढाई.

'गोटूल' ही गोंड आदिवासींची अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी सांस्कृतिक रचना. निरोगी उत्तम नागरिक तयार करणारी अनौपचारिक शाळाच. पण फक्त तरुण मुले-मुली तिथे एकत्रित येतात म्हणून विकृत गैर-आदिवासी समाजाच्या टीकेला बळी पडून तथाकथित सुधारणेच्या नावाखाली स्वतःच लोकांनी गोटूल मोडून टाकले होते. अभ्यासातून लोकांच्या लक्षात आले की गोटूल हे आपल्या सांस्कृतिक-सामाजिक संघटनेचे केंद्रही होते. हे कळताच 'गोटूल' ची पुन्हा स्थापना करण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला. गावाचे गोटूल बांधायचे ठरल्यावर ते गावहद्दीतील निस्तार हक्काच्या जंगलातून सागाचे लाकूड आणूनच बांधायचे, असेही ठरले. प्रश्न निस्तार हक्काचा असल्याने वन विभागाला अर्ज करून परवानगी मागण्याचा प्रश्नच नव्हता. सर्व गावकऱ्यांनी मिळून सागाची लाकडे आणून गावात गोटूल, म्हणजे एक झोपडी बांधली. वन विभागाने ती लाकडे जप्त करून नेण्याचा प्रयत्न करून बघितला, पण गावकऱ्यांच्या शांततामय निर्धारासमोर ते टिकू शकले नाहीत. शेवटी त्यांनी सशस्त्र पोलिसांची मदत घेतली. गावातील लोकसंख्येपेक्षा जास्त सशस्त्र पोलीस वन विभागाच्या ताफ्यासह गावात येऊन दाखल झाले. पुरुष मंडळी घराघरातच राहिली. स्त्रियांनीच गोटूलजवळ एकत्र होऊन प्रसंगाचा सामना केला. आधीच ग्रामसभेत ठरल्याप्रमाणे त्यांनी पोलिसांना स्पष्ट सांगितले की "तुमच्या बंदुकीचा सामना आम्ही बंदुकीने करणार नाही. तुम्हाला दगड किंवा काठीनेही मारणार नाही. इतकेच काय, तुम्हाला शिव्याही देणार नाही. पण एक गोष्ट मात्र पक्की लक्षात ठेवा. तुम्ही आमचे गोटूल उपटून लाकडे जप्त करून नेलीत तर आम्ही सर्व पुन्हा जंगलात जाऊ, पुन्हा सागाचीच लाकडे कापून आणू व पुन्हा आमचे गोटूल बांधू. तुम्ही जितक्या वेळा उपटून न्याल तितक्या वेळा आम्ही पुन्हा बांधू. यानंतरही तुम्हाला न्यायचे असेल तर न्या !" तरी गोटूल तोडून लाकडे जप्त करून नेण्यात आली. लोकांनी बोलल्याप्रमाणे दोन दिवसांत पुन्हा गोटूल उभारले.

या घटनेची प्रतिक्रिया ३२ गावांच्या धानोरा जमीनदारी इलाक्यात उमटली. इलाका बैठकीत लोक-संताप प्रगट झाला. कोणी म्हणाले, मोर्चा काढू. कोणी म्हणाले, धरणे देऊ. कोणी अर्ज व प्रतिनिधी मंडळाचा मवाळ प्रस्तावही समोर ठेवला. लोकांनी विचार केला, माशाची ताकद जशी पाण्यात तशी आमची ताकद गावात. कार्यक्रम गावातच करण्याचा असावा. त्यांनी विचार केला, मेंढा गावकऱ्यांचे काय चुकले? त्यांनी परवानगी न मागता सागवान लाकडे वापरून आपले गोटूल बांधले हेच ना? मग गावोगावी अशीच गोटुले बांधण्याचा कार्यक्रम घेऊ या. किती गावे तयार आहेत? बारा गावे तयार झाली. ठरलेल्या एकाच दिवशी बाराही गावांनी आपल्या गावात सागाच्या लाकडांची गोटुले बांधून उभी केली. एक गोटूल उपटले तर बारा तयार झाली. बारा उपटली तर किती होतील? – याचे गणित शासनाला कळले. शासनाने पुन्हा गोटूलला हात लावला नाही.

४) सर्वांच्या प्रामाणिक परिश्रमाची किंमत (नैतिक आणि आर्थिक) समान असली पाहिजे, या मुद्द्याकडे गावाचे फारसे लक्ष तेव्हा नव्हते व आजही नाही.

विनोबांनी पुढे भूदान आंदोलनाच्या पुढचे पाऊल म्हणून ग्रामदानाचा विचार मांडला. महाराष्ट्र शासनाने १९६४ मध्ये त्याकरता कायदा व नियमही केले. त्यांची माहिती मेंढा (लेखा) गावकऱ्यांना मिळाली. त्यांचा त्यांनी अभ्यास केला. पण अजून त्यावर सर्वसहमती न झाल्यामुळे ग्रामदानाचा निर्णय झालेला नाही. प्रयत्न सुरू आहे.

विनोबांनी नमूद केलेल्या चार अनिवार्य मुद्द्यांपैकी काही थोड्या भागाची पूर्तता झाली आहे. बऱ्याच मुद्द्यांची पूर्ण पूर्तता झालेली नाही. तरीही अनेक प्रसंगांतून प्रचंड लोकशक्ती मेंढा (लेखा) गावात प्रकट झाल्याचे दिसून येते. सर्व मुद्द्यांची पूर्तता झाल्यास ती शक्ती किती प्रचंड असेल याची कल्पना केलेली बरी.

x x x

विनोबा गणिती पद्धतीने सूत्ररूपात विचार मांडण्यात अतिशय कुशल आहेत. 'स्वराज्य-शास्त्र' या छोट्याशा पुस्तिकेत अनेक मुद्दे सूत्ररूपाने मांडून त्यावरील चर्चेलाही त्यानी तोंड फोडले आहे. त्या सर्वांचाच विचार या लेखात करायचा तर विचारांचा महासागर ओंजळीत पकडण्याचा प्रयत्न केल्यासारखेच होईल. गांधी-विनोबांसारखे महात्मेच ते करू जाणोत. एक सर्वसामान्य नागरिक

व प्रयोगशील विद्यार्थी या नात्याने माझ्या ओंजळीत आलेली मौक्तिके तेवढी मांडण्याचा अल्पसा प्रयत्न मी इथे केला आहे. शेवटच्या आणखी एका मुद्द्याचा विचार 'स्वराज्य-शास्त्र' व मेंढा (लेखा) गाव-समाजातील प्रक्रिया यांच्या संदर्भात आपण करू या. तो असा –

अहिंसेवर उभारलेली राज्यपद्धती टिकू शकेल का? या संबंधात विनोबांनी 'स्वराज्य-शास्त्र' मध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्यांपैकी काही निवडक मुद्दे असे –

* *"आजच्या घटकेला राज्यव्यवस्थेचा जीवनातील प्रत्येक अंगप्रत्यंगाशी संबंध येऊन पोहोचतो. म्हणून सज्ञनांना, महाजनांना आणि जनतेला – तात्पर्य, कोणालाच त्याविषयी उदासीन राहता येत नाही."*

* *"जनतेने स्वशक्तीने असले व्यापक राजकारण उचलावयाचे, म्हणजे अहिंसेच्या प्रयोगाशिवाय ते शक्य नाही. कारण हिंसा ही जनतेची शक्ती नव्हे."*

* *"जन दुबळे पडले, सज्ञन उदासीन झाले, आणि दुर्जनांचा प्रतिकार करण्याची जबाबदारी महाजनांवरच पडली, म्हणजे त्यांना हिंसेशी हिंसा लढविण्यापलीकडे दुसरे काही सुचू शकत नाही. पण जन, सज्ञन आणि महाजन तिघेही एकवटल्यानंतर – आणि व्यापक राजकारणात तिघांना एकवटल्याशिवाय गत्यंतर नाही – दुर्जनांशी, मग ते कितीही संघटित असले तरी, अहिंसेने टक्कर देणे अशक्य नाही. पण तेच इष्ट आहे, कारण त्याने दुर्जनांचे मूळच, म्हणजे त्यांची दुर्जनता, छेदण्याची सोय राहते."*

* *"जन, सज्ञन आणि महाजन ह्यांनी अहिंसेच्या पायावर एकवटणे हाच दुर्जनांना कायमचा दरारा आहे. हे तिघे अहिंसेशिवाय एकवटणे शक्यही नाही, हे वर सुचविलेच आहे. तसे त्यांनी एकवटून दुर्जनांना कायमचा दरारा निर्माण करणे, हेच उत्तम राज्यव्यवस्थेचे मुख्य लक्षण आहे. बाकीची सारी लक्षणे असून ते एक नसेल, तर सर्वांगसुंदर पण चैतन्य-विहीन चित्राप्रमाणे ते होईल."*

* *"अहिंसक राज्यपद्धती अथवा संकुल युद्धाची तयारी, असा प्रश्न उभा झाल्यानंतर अहिंसेचा मार्ग आपोआपच मोकळा होतो असे म्हटले, तरी अहिंसक राज्यपद्धतीसाठी संघटना आणि शिक्षण-प्रचार इत्यादी गोष्टी लागतीलच. संकुल युद्धासाठी जी संघटना लागते, तिच्याहून अहिंसेची संघटना जरी प्रकाराने वेगळी, तरी जनतेतील प्रत्येक व्यक्तीला स्पर्श करण्याइतकी ती व्यापक असावी लागेल."*

*"अहिंसेकडे सहजच वळलेल्या लोकमताला ज्ञान-पूर्वक अहिंसक बनावे लागेल. सर्वसामान्य जनता वृत्तीने नेहमी अहिंसक असते, परंतु ती तत्त्वज्ञानाने अहिंसक बनली पाहिजे. म्हणजे निष्क्रिय अहिंसा ही चालणार नाही. तिच्याऐवजी सक्रिय अहिंसा, जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापणारी, लागेल."*

*"अहिंसक पद्धतीच्या बचावाची कल्पना करताना मात्र जणू शरीराला आणि मालमत्तेला कुठेच तकलीफ न होता कार्यभाग व्हावा, अशी आशा करण्यात येते. पण अहिंसक बचाव हा जरी सर्व बाजूंनी कुशल आहे, तरी सुखासुखी तो साधेल असे आश्वासन नाही. थोडे कल्पनाशक्तीला चालना देऊन आत्मक्लेशाची आणि प्राणार्पणाची, प्रतिपक्षाच्या केसालाही धक्का न लावता शांत प्राणार्पणाची तयारी लागेल."*

*"लढाईची तयारी अहिंसेला लागतेच. सर्व जगात अहिंसेचा प्रचार झाल्यानंतरही तयारीची ही गरज नाहीशी होईल, असे नाही. एकदा केव्हा तरी कमावलेले जन्मभर खात रहावे, अशी सोय हिंसेतही नाही आणि अहिंसेतही नाही. प्रतिकारशक्ती सर्वदा जाग्रत राखावी लागेलच."*

*"अतिमानवाची कल्पना केली, तर प्रतिकाराचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. प्रतिकाराची भाषा आपण बोलतो, ह्याचा अर्थच, आपण सामान्य मानवकोटीत विचार करतो, फक्त पशुत्व बाद करतो. आणि तेही सर्व मानवांतून सर्वथा नाहीसे होण्याची अपेक्षा करीत नाही. मानवतेच्या अंकुशात ते रहावे, एवढीच अपेक्षा ठेवतो. म्हणून अहिंसक रचना करणे कोण्याही प्रकारे अशक्य नाही. आणि अहिंसक रचना जितकी टिकाव धरील तितकी दुसरी कोणतीही रचना टिकाव धरू शकणार नाही."*

*"हिंसेसाठी फार मोठे बलिदान कल्पून अहिंसेसाठी मात्र अल्प बलिदान अथवा अबलिदान कल्पिण्यात येते. ही दुबळी अहिंसा होय. हिचा जगात टिकाव लागावयाचा नाही, हे निश्चित आहे."*

मेंढा (लेखा) हे गाव गडचिरोली जिल्ह्यातील जंगल व आदिवासी पट्ट्यात एकीकडे केंद्रित राज्यसत्तेची हिंसा तर दुसरीकडे नक्षलवादी हिंसा, या दोन हिंसांच्या प्रवाहामधे आहे. अहिंसा-आधारित राज्यव्यवस्थेच्या संदर्भात मेंढा (लेखा) संबंधी लक्षणीय बिंदू पुढीलप्रमाणे सांगता येतील –

* सहजच अहिंसेकडे वळलेल्या लोकमताला ज्ञानपूर्वक अहिंसक बनण्यामध्ये अभ्यास-मंडळ या रचनेची खूपच मदत झाली, व होत आहे.

* मेंढा (लेखा) गावसमाजाची अहिंसक लढाईच्या तयारीची कल्पना 'गोटूलची लढाई' या उदाहरणावरून आपल्याला येऊ शकते. प्रतिपक्षाच्या केसालाही धक्का न लावता शांत प्राणार्पणाची तयारी असेल तर काय होऊ शकते, याचा हा मोठा पुरावाच मानावा लागेल.

* वन विभाग व पोलीस यांच्याशी संघषपिक्षा गाव-हद्दीतील बांबू-कटाईच्या संदर्भात पेपरमिलशी झालेली लढाई जास्त कठीण होती. हिंसेचा आधार असणारे सर्व गट एकजूट होऊन एका लहानशा गावाविरोधात पूर्ण ताकदीनिशी उभे ठाकले होते. एकटा गावसमाज, केवळ आपल्या आक्रमक अहिंसेच्या बळावरच, त्यांना पुरून उरू शकला.

* भीती दाखविणे किंवा भिणे हा हिंसेचा एक मुख्य आधार आहे. 'कोंबडा बाजार' उघडपणे भरविण्याच्या प्रकरणात भीतीतून मुक्त होत आक्रमक अहिंसक लढाई लढण्याच्या एका अभिनव मार्गाचे सृजनच या गावसमाजाने केले आहे.

* वैयक्तिक लोभ हा हिंसेचा दुसरा सोबती. भ्रष्टाचाराच्या प्रश्नावर परिणामकारक उपाययोजना शोधून काढताना पुन्हा एकदा या गावसमाजाच्या सृजनशील अहिंसक शक्तीचा परिचय होतो. त्यांनी गावाचा कायदाच पारित केला की 'ज्याला आपले अडलेले काही काम करून घेण्यासाठी लाच द्यायची असेल त्याने ती खुशाल द्यावी. अट एवढीच की ज्याला लाच दिली त्याच्याकडून पावती घ्यावी, किंवा तेवढीच रक्कम गावफंडात जमा करावी.' लाच घेऊन पावतीही देणार नाही व कामही करणार नाही, असे म्हणून कर्मचाऱ्याने एखाद्या गावकऱ्यास परत पाठविल्यास दुसऱ्या दिवशी दहा गावकऱ्यांनी तिथे जावे व त्यांनाही परत यावे लागल्यास संपूर्ण गावाने जाऊन तिथे उभे रहावे असे ठरले आहे. गावाला असे कधीही जावे लागले नाही.

* बाहेरच्यांशी लढणे त्यामानाने सोपे असते, पण स्वत:च्याच ग्रामपंचायतीच्या सरपंचाला आक्रमक अहिंसक प्रतिकाराचा उपयोग करून 'तू गावापेक्षा मोठा नाहीस' हे समजावून सांगण्याची गावाने वापरलेली पद्धत विलक्षणच म्हणावी लागेल.

* अगदी शेजारी लागून असलेल्या लेखा या मोठ्या गावासोबत झालेल्या संघर्षात अहिंसक संघर्षाचे शस्त्र अधिकच तावून-सुलाखून निघालेले दिसते. आधी तीव्र विरोध; मग तुम्ही तुमच्यासाठीच करता, आमच्यासाठी कां नाही करत, अशी तक्रार; आणि त्यानंतर स्वतः हिंसेचा मार्ग सोडून मेंढा (लेखा) गावसमाजाने दाखविलेल्या अहिंसक मार्गावर चालण्याची सुरुवात – असा बदल केवळ मेंढा (लेखा) गावसमाजाच्या अहिंसेवर उभारलेल्या राज्यपद्धतीमुळेच होऊ शकला.

१९८७ पासून आजपर्यंत गावाबाहेरील व गावाआतील अनेक संकटांना यशस्वीपणे तोंड देत मेंढा (लेखा) गावसमाज अजूनही टिकून आहे, तो अहिंसेवर आधारित राज्यपद्धतीच्या आधारेच.

*(साम्ययोग-साधना १६ नोव्हेंबर २००४ मधून साभार)*

गडचिरोली जिल्ह्यातील एका खेड्यातील सभा. जवळपासच्या खेड्यांतील आदिवासी स्वशासनाबद्दल विचार करायला जमलेले. बाहेरून आलेले एक विचारवंत एक घोषणा देतात – 'आमच्या गावात आमचे सरकार'. चर्चा सुरू असते. एक वृद्ध आदिवासी विचारतो, "आमच्या गावात आमचे सरकार, तर दिल्ली-मुंबईत कुणाचे सरकार आहे? ते आमचे सरकार नाही का?" त्या प्रश्नाने सगळे चमकतात. मांडणीत नक्कीच कुठेतरी काही चुकले आहे ! बऱ्याच चर्चेनंतर एक नवी घोषणा जन्म घेते – 'दिल्ली-मुंबईत आमचे सरकार, पण आमच्या गावात आम्हीच सरकार !'

'मागासलेले' समजल्या जाणाऱ्या आदिवासींमधल्या या चर्चेतून प्रातिनिधिक लोकशाही आणि सहभागी लोकशाही यांतला फरक ठळकपणे समोर येतो. गावकऱ्यांनी जर गावाचा कारभार पहायचा असेल – विशेषतः गावाच्या पर्यावरणाचे रक्षण-संवर्धन करायचे असेल – तर हा शक्तिशाली संदेश पसरायला हवा. भारतातील पुढारी आणि प्रशासक यूनोत किंवा इतरत्र भारतातील लोकशाहीबद्दल कितीही बोलघेवडेपणा करोत, वस्तुस्थिती ही आहे की प्रत्यक्षात लोकांपर्यंत लोकशाही नाममात्र पोचली आहे. सगळे निर्णय राजकीय पुढारी आणि नोकरशहाच घेत आहेत.

– **अनिल अग्रवाल**

# मेंढा (लेखा) गावाबाबत सामान्यतः विचारले जाणारे प्रश्न व त्यांना उत्तरे

– देवाजी नवलू तोफा

## गाव : पूर्वीचे आणि आताचे

**प्रश्न १ – गाव पूर्वी कसा होता ? त्यात आता काय फरक पडला?**

उत्तर – बाहेरची फुलपॅन्टवाली व्यक्ती किंवा गाडी गावात आल्यास लोक भीतीमुळे जंगलात पळून जात असत किंवा गाडीचा आवाज आल्याबरोबर घरात लपून जायचे. कुणीही बाहेर निघत नव्हते. आता – फुलपॅन्टवाला व गाडीला भीत नाहीत. पूर्वी लोकांत कमीपणाची भावना होती. आता ती कमी होऊन लोक बाहेरच्यांशी बरोबरीने वागायला लागले आहेत. पूर्वी ठेकेदार गावात आला की लोक मजुरीसाठी त्याच्याकडे जाऊन पडायचे. आता तसे जाऊन पडत नाहीत. पूर्वीपासूनच गाव हद्दीत गिट्टीखदान आहे. परंतु बाहेरून येणारा ठेकेदारच ते काम करीत होता. रेट तोच ठरवीत होता. तो देईल ती मजुरी लोकांना मुकाट्याने घ्यावी लागायची. आता – इ्वाक्रा महिला गटामार्फत गावाने ही गिट्टीखदान आपल्या हातात घेतली आहे. त्यामुळे मजुरांचे शोषण बंद झाले आहे व गावाची लाचारी कमी झाली आहे.

पूर्वी लोक घरोघरी दारू काढायचे, प्यायचे व विकायचे सुद्धा. पण आता गावात संपूर्ण दारू-व्यवसाय-बंदी झाली आहे. गावात दारूची विक्री व खरेदी पूर्ण बंद आहे. रीतिरिवाजाप्रमाणे दारू पाहिजे असेल तर ग्रामसभेकडे अर्ज करावा लागतो. ग्रामसभेने जितकी दारू काढण्यास परवानगी दिली तितकीच काढून वापरता येते. बाहेरून पिऊन येऊन कुणी चुपचाप घरी राहिल्यास चालते, पण त्याने झगडा-भांडण किंवा गडबड-गोंधळ केल्यास दंड होतो.

कर्जासाठी पूर्वी लोक बाहेरचे सावकार, मद्रासी, दुकानदार, सधन कास्तकार यांचेवर अवलंबून होते. ३ ते ६ महिन्यांतच ते कर्ज देढीने परत करावे लागायचे. व्याज दर दर साल दर शेकडा १०० रु. किंवा त्यापेक्षाही जास्त पडायचा. बाहेर जाऊन चकरा मारण्यात वेळही जात होता. सावकारासमोर

लाचार होऊनच वागावे लागत होते. सरकारी कर्ज घेण्यासाठी पुष्कळ कागदपत्रे लागतात, ती तयार करणे अत्यंत त्रासदायक होते. आता गावातच ग्रामसभेमार्फत प्रत्येक गरजू व्यक्तीला कर्ज मिळते. एक वर्षाच्या आत कर्ज परत केल्यास व्याजही लागत नाही. एक वर्षानंतरही फक्त दर साल दर शेकडा २ टक्के दरानेच व्याज द्यावे लागते. त्यामुळे सावकारी पाशातून पूर्ण सुटका झाली आहे.

पूर्वी सरकारी अधिकारी, ठेकेदार, व्यापारी, संस्था त्यांना गावात येऊन काही काम करायचे असल्यास गावाला विचारत नव्हते. आता गावाच्या ग्रामसभेच्या परवानगीशिवाय कोणालाही काम करता येत नाही.

पूर्वी ग्रामसभेत, विचार करण्यात, निर्णय घेण्यात व न्यायनिवाड्यात महिलांचा सहभाग नव्हता. आता या सर्व कामात महिला सुद्धा सहभागी होतात.

लोक पूर्वी शेतीपेक्षा जंगलावरच जगण्यासाठी जास्त अवलंबून होते व आजही आहेत. स्वातंत्र्यापूर्वी जंगलातून गरजेपुरता निस्तार आणू शकत होते, पण त्यासाठी जमीनदाराकडे बेगार करावी लागायची. स्वातंत्र्यानंतर बेगार बंद झाली, पण जंगल, जे आधी जमीनदाराचे होते ते, सरकारचे म्हणजेच वन विभागाचे झाले. आपण जंगलातून काही निस्तार आणतो म्हणजे सरकारी जंगलातून चोरी करतो अशी भावना बनली. त्याचा परिणाम लोक जंगलापासून तुटण्यात व अवैध कटाई व चोरी वाढण्यात झाला होता. आता – निस्तार हक्काचा कायदा व त्याप्रमाणे असलेले हक्क गावाला माहीत झाले आहेत. 'ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन' या शासकीय योजनेच्या माध्यमातून निस्तार हक्क असलेल्या वनाचे व्यवस्थापन गावसमाजाने आपल्या हातात घेऊन त्यावर नियंत्रण कायम केले आहे. लोक जंगलाशी जोडल्या जाऊन अवैध कटाई व चोरी बंद झाली आहे.

पूर्वी लोक फळे, पाने किंवा शहदासाठी सुद्धा झाडे तोडून टाकीत. पण ग्रामसभेने कायदा करून मनाई केल्यापासून ते बंद झाले आहे.

पूर्वी आग्यामाशांचा शहद (मध) काढताना आग लावून पूर्ण छत्ता (पोळे) नष्ट करीत. त्यात मधमाशा, त्यांची अंडी-पिल्ले सर्व मरत. शहदही कमी व अशुद्ध मिळत असे. आता आग लावणे बंद केले आहे. छत्ता नष्ट न करता शास्त्रीय पद्धतीने शहद काढतात. त्यामुळे मधमाशा, त्यांची अंडी-पिल्ले मरत नाहीत, व शहदही शुद्ध तसेच जास्त मिळतो.

पूर्वी सरकारने गावहद्दीतील निस्तार हक्काच्या जंगलातील बांबू-कटाईचा ठेका पेपर मिलला दिला होता. पेपर मिलचे लोक जंगलात मजुरांना नेऊन तुकडा बांबू कटाई करीत होते. त्यामुळे कास्तकारांना व बांबू कारागीरांना त्याच्या उपयोगाचा लांब बांबू मिळत नव्हता व दुसरीकडे बांबू रांझीचेही नुकसान होत होते. आता – संयुक्त वनव्यवस्थापन समिती व वन विभाग मिळून लांब बांबू-कटाई करतात. त्याचा डेपो जंगलातच लावतात. शेतकरी व बांबू कारागीरांना आवश्यक पुरवठा केल्यावरच उरलेला बांबू पेपरमिल किंवा इतर व्यापाऱ्यांना विकण्यात येतो.

पूर्वी भरपूर भ्रष्टाचार होता. लाच दिल्याशिवाय कोणतेही काम होत नव्हते. आता लाच दिल्याशिवाय सर्व कामे होतात. पूर्वी गावचे लोक असे समजत होते की सर्व सरकारी कर्मचारी गावाचे दुष्मन, शोषण करणारे व लुटारू लोक आहेत. आणि कर्मचारी समजत होते की गावचे लोक सरकारी कर्मचाऱ्यांचे दुष्मन, स्वार्थी व मतलबी आहेत. दोघेही एकत्र बसून विचार करीत नव्हते. कर्मचारी सतत लोकांना दाबून ठेवण्याचाच प्रयत्न करीत होते, व लोकही दबून जात होते. आता – दोघेही एकत्र बसून विचार करायला लागले आहेत. लोक कर्मचाऱ्यांना प्रश्न विचारू लागले आहेत. कर्मचारी माहिती द्यायला लागले आहेत. प्रेमाने व आदराने बोलायला लागले आहेत. दुष्मनीची भावना नष्ट होऊन शोषणही कमी झाले आहे.

पूर्वी लोक असे समजत होते की आम्ही काहीच करू शकत नाही, राजकीय पुढारीच सर्वकाही करू शकतात. आणि राजकीय पुढारीसुद्धा तसेच समजत होते. आता – गावातील लोकांना व तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांना असे समजून आले आहे की जे लोक करू शकतात ते पुढारी कधीही करू शकत नाहीत. लोकांची ताकत वाढली तरच पुढाऱ्याचीही ताकत वाढेल.

पूर्वी, सर्वच स्वयंसेवी संस्था जनतेच्या नावावर देश-विदेशातून पैसे आणतात, पण त्यांच्या कामाचा लोकांना खरोखर फायदा होत नाही, असा समज गावातील लोकांमध्ये होता. परंतु आता – ज्या स्वयंसेवी संस्थांशी गावाचा जास्त संबंध आला त्या 'वृक्षमित्र', 'सर्च' व 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थांचे काम व काम करण्याच्या पद्धतीच्या अनुभवावरून हा समज चुकीचा होता हे लोकांना समजले आहे. वर उल्लेखित स्वयंसेवी संस्थांसोबत जोडून काम

करण्यामुळे गावाची व गावामुळे संस्थेची अशा प्रकारे दोघांचीही ताकत वाढून राहिली आहे.

पूर्वी आजूबाजूच्या गावांचा असा समज होता की मेंढा गावातील लोक एवढ्या मोठ्या सरकारसमोर टिकूच शकणार नाहीत. तसे ते बोलूनही दाखवीत होते. आता – अनुभवांती गाव असे टिकू शकते हे त्यांनाही पटायला लागले असून त्या दिशेने त्यांचे काही कामही सुरू झाले आहे.

पूर्वी गावाची काही संघटना तर होती, पण ती कमजोर होती. लोक अभ्यास करून विचाराने काम करीत नव्हते. एकजूट नव्हती. लोक विखुरलेले होते. आता – कोणताही निर्णय घेण्याआधी अभ्यास मंडळात अभ्यास करतात व मगच विचारपूर्वक सर्वसहमतीने निर्णय घेतात. त्यामुळे विखुरलेपणा नष्ट होऊन एकजूट झाल्याने गावसंघटना पक्की झाली आहे.

## गाव-संघटन : कसे आहे? कसे झाले?

**प्रश्न २ – गाव-संघटना बांधण्यासाठी कोणी पुढाकार घेतला?**

**उत्तर –** 'जंगल व लोक' या विषयाच्या अभ्यासासाठी एकत्रित आलेल्या व ज्यांना स्वतःहोऊन अभ्यासात आवड आहे अशा स्त्री-पुरुषांच्या गटाने गाव-संघटन बांधणीसाठी पुढाकार घेतला.

**प्रश्न ३ – गाव-संघटनेची गरज कां पडली?**

**उत्तर –** ज्याच्यावर सर्वांचे जीवन अवलंबून आहे असे जंगल हा गावाचा सर्वात जास्त जिव्हाळ्याचा मुद्दा. 'निस्तार हक्क' म्हणजे जंगलरूपी आईशी गावाची जोडलेली नाळच. या संदर्भात केवळ सरकार, राजकीय पुढारी, कर्मचारी व स्वयंसेवी संस्था काहीच करू शकणार नाहीत, गाव-संघटनाच हा प्रश्न सोडवू शकते, हे लक्षात आल्याने गाव-संघटनेची गरज जाणवली.

**प्रश्न ४ – गाव-संघटन बांधताना काय काय अडचणी आल्या? त्या अडचणींना तोंड कसे दिले? गाव-संघटन कशामुळे टिकले आहे?**

**उत्तर –** गावातील दारू, व संघटनेत महिलांचा सहभाग नसणे ही मुख्य अडचण असल्याचे लक्षात आले. त्याशिवाय, गरीब असो की श्रीमंत, व्यक्तीमधील लोभ, अहंकार आणि अज्ञान या सुद्धा अडचणीच असल्याचे स्पष्ट झाले.

या अडचणींना तोंड देऊन त्यावर मात करण्याकरिता वापरलेली पद्धत अशी होती – अभ्यास मंडळात लोकांसोबत चर्चा करणे, प्रश्न उपस्थित करून उत्तर सामूहिकरित्या शोधणे, शंका-कुशंकांचे सामूहिक चर्चेतून निरसन करणे, उदाहरण किंवा दाखला देऊन स्पष्ट करणे, प्रत्यक्ष झालेल्या कामाची आठवण करून देऊन आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढवणे, ग्रामसभेत सर्वसहमतीने योग्य निर्णय घेऊन त्यांच्या अंमलबजावणीत सर्वांना सहभागी करून घेणे व त्या कृतीतून मिळालेल्या अनुभवातून पुन्हा शिकणे. या पद्धतीने वर उल्लेखित प्रमुख अडचणींवर मात कशी केली याचे थोडक्यात वर्णन पुढीलप्रमाणे –

*महिलांचा सहभाग :* अभ्यासातून असे समजले की जंगलावर निस्ताराचे हक्क मिळवून घ्यायचे असतील तर मजबूत गाव-संघटना आवश्यक आहे, व त्याकरिता गाव-संघटनेत महिलांचा पुरुषांच्या बरोबरीने सहभाग जरूरी आहे. अभ्यासगटात सहभागी महिलांच्या मदतीने इतर महिलांशी संपर्क साधून लहान लहान गटांत महिलांसोबत यावर चर्चा करण्यात आली. तेव्हा त्यांनी दारूचा मुद्दा समोर आणला. त्या म्हणाल्या, "आम्हालाही यायची इच्छा आहे, पण आम्ही कशा येणार? तुम्ही बहुतेक सर्व पुरुष मंडळी सतत दारू पिऊन असता. गावाच्या बैठकीतही दारू पिऊन येता. वाटेल तसे बोलता. गोंधळ घालता. चेंगड करता. मुद्द्याला धरून बोलत नाही. मुद्दा असतो एक आणि बोलता वेगळेच. त्यामुळे आम्ही येऊ शकत नाही. आधी गावातील दारू बंद करा, तर आम्ही येऊ."

*दारू :* महिलांनी मुद्दा रेटल्यामुळे दारूवर अभ्यास मंडळात व पुढे गावात चर्चा सुरू झाली. दारू बंद तर झाली पाहिजे, पण करणार कोण? दारू न पिणारे व दारू न विकणारे लोक यांनीच फक्त निर्णय घेतल्याने दारू बंद होऊ शकणार नाही हे लक्षात आल्यावर दारू पिणारे व विकणारे यांच्याशी चर्चा सुरू झाली. अभ्यास मंडळाने त्यांना सांगितले की "आम्ही तुम्हाला दारू बंद करा असे सांगत नाही. आम्हाला फक्त दारू पिणे व विकणे यापासून फायदा आहे की नुकसान, हे अभ्यासातून समजून घ्यायचे आहे. दारू ही सगळ्यांच्या फायद्याची असेल तर ग्रामसभेत सर्वसहमतीने निर्णय घेऊन सर्वांनीच हा धंदा सुरू करावा, वाढवावा असे आपण ठरवू." सर्वांनी चर्चेमधे मनमोकळेपणाने बोलावे, कुणीही कुणाला बोलताना अडवू नये; सर्वांनी डोळे, कान व तोंड उघडे ठेवून चर्चेत भाग घ्यावा, असे आवाहनही सर्वांना करण्यात आले. पुष्कळ जण दारू काढून विकतात, पण

सर्वांत जास्त विकणारा कोण? हे ठरवून त्यालाच आधी प्रश्न विचारण्यात आले. दारू काढून विकण्यात तुला फायदा आहे काय? जे दिसते तेच सांगा, काल्पनिक बोलू नका, अशीही विनंती प्रश्नासोबतच करण्यात आली. *उत्तर* – हो, फायदा आहे. सर्वांनी सहमती दिली : हो, फायदा आहे. पुढचा *प्रश्न* – किती फायदा आहे? *उत्तर* – पुष्कळ फायदा आहे. सर्वांनी सहमती दर्शवली. पुढचा *प्रश्न* – काय काय फायदा आहे? *उत्तर* – पुष्कळ पैसा मिळतो. धान्य मिळते. काही जण दागिने, भांडीकुंडी, घड्याळ, रेडिओ व कपडे सुद्धा घेऊन येतात. काही जण शेतीची औजारे, कुऱ्हाड, फावडे, मच्छी पकडण्याचे सामान, दोर, बालटी इ. सुद्धा आणतात. काहींनी आपली जमीन सुद्धा त्यासाठी दिली आहे. काहींनी तर घरावरील कवेलू सुद्धा काढून आणून दिले आहेत. यालाही सर्वांनी संमती दिली, की हे म्हणणे अगदी खरे आहे. पुढील *प्रश्न* – पण हा फायदा आपल्या गावात किती लोकांना मिळतो? *उत्तर* – ४-५ लोकांना मिळतो. पुढील *प्रश्न* – हे झाले फायद्याचे, आता सांगा की तुला यात काही नुकसान सुद्धा आहे काय? *उत्तर* – नुकसान सुद्धा आहे. *प्रश्न* – कुणाचे व काय नुकसान? *उत्तर* – गरीब लोकांच्या मेहनतीचा मजुरीचा पैसा किंवा वर सांगितलेल्या वस्तू सर्व दारूवाल्याकडे येतात. दारू पिऊन घरी जाऊन महिलांना मारहाण करतात. मुलांना उपाशी ठेवतात. गावात झगडे-भांडण, मानसिक तणाव निर्माण करणे, शिवीगाळ करणे, कुठेही पडून राहणे, मुलांना पुस्तक व कपडे नाहीत म्हणून शाळेत न पाठवणे, त्यातही महिलांना जास्त त्रास – हे सगळे होते. कधी कधी दारूसाठी चोरी सुद्धा करतात. *प्रश्न* – फायदा किती जणांचा व नुकसान किती जणांचे? *उत्तर* – फायदा ४-५ जणांचा व नुकसान संपूर्ण गावाचे. *प्रश्न* – हा नुकसानीचा धंदा करावा काय? तुला काय वाटते? *उत्तर* – असा धंदा करावा असे वाटत नाही, पण मग काय करावे? *प्रश्न* – आमचे वाडवडील कसे पोट भरत होते? दारू काढून विकत होते काय? *उत्तर* – जंगलावर जास्त जगत होते, शेती व मजुरी करून पोट भरत होते. *प्रश्न* – दारू बंद झाली पाहिजे असे तुलाही वाटते काय? *उत्तर* – झाली पाहिजे, पण करणार कोण? *उत्तर* – सरकार, कर्मचारी, गाव करू शकणार नाहीत. जो विकणारा आहे त्यानेच ठरविले तर होईल. सर्व विकणाऱ्यांनी दारू काढणे व विकणे बंद करण्याचा निर्णय घेतला. सर्वांनी सहमतीने पाठिंबा दिला. गावातील दारू बंद झाली व महिला गाव-संघटनेत सहभागी झाल्या.

*लोभ, अहंकार व अज्ञान :* व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर सत्याचा शोध घेण्यासाठी लहान गटांत चर्चा; सर्वांचे हित – व्यक्तीचे व संपूर्ण गावाचेही – लक्षात आणून घेणे, व शेवटी निर्णय सर्व मिळून सर्वसहमतीने घेणे; कुणावरही जबरदस्तीने निर्णय न लादता त्याच्याशी वारंवार चर्चा करीत राहणे, यामुळे सत्यशोधन चांगले होऊन गाव-संघटन अधिक मजबूत होत गेले.

**प्रश्न ५ – बाहेरचे राजकीय पुढारी, शासकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्था यांची मदत घेता काय? घेतल्यास कशा पद्धतीने?**

**उत्तर –** हो, मदत घेतो. अभ्यास मंडळात कुणीही येऊ शकतात. कुणालाच तिथे बंधन नाही. ऐकून आम्ही सगळ्यांचेच घेतो, पण निर्णय मात्र गावाच्या ग्रामसभेत सर्वसहमतीनेच घ्यायचा हे आमचे पक्के ठरलेले आहे. निर्णय घेताना ग्रामसभेत बाहेरच्या लोकांच्या सहभागाला बंदी आहे.

**प्रश्न ६ – अभ्यास मंडळाची कल्पना कोठून आली? अभ्यास मंडळ म्हणजे काय?**

**उत्तर –** 'वृक्षमित्र' संस्था व गाव मिळून १९८७-८९ मधे 'जंगल व लोक' या विषयाचा सहभागी पद्धतीने अभ्यास करताना अभ्यास मंडळाची कल्पना पहिल्यांदा आली. त्यापूर्वीही गावात अभ्यासात आवड असणारे लोक होतेच, पण त्यांच्या अभ्यास-क्षमतेचा उपयोग गावासाठी होत नव्हता.

अभ्यास मंडळ म्हणजे, अभ्यासाची ज्यांना आवड आहे अशा, म्हणजेच ज्यांना कोणत्याही गोष्टीचा कीस काढायला आवडते अशा, गावातील स्त्री-पुरुषांचा गट; जिथे गावासंबंधीचे, ग्रामसभेतच घ्यावयाचे निर्णय होणार नाहीत हे आधी ठरलेले आहे अशी रचना, जिच्यामुळे योग्य निर्णय घ्यायला ग्रामसभेला मदत होते.

**प्रश्न ७ – अभ्यास मंडळ कसे बनवता? सदस्य कसे व कोण निवडतो? त्यात महिलाही भाग घेतात काय? किती?**

**उत्तर –** अभ्यास मंडळ, त्याचे सदस्य कुणी दुसरा निवडून बनत नाही. ज्यांना अभ्यासाची आवड आहे तेच आपल्या इच्छेने जमतात. त्यालाच अभ्यास मंडळ म्हणतात. आवड असणाऱ्या महिलाही असतात व त्या सुद्धा संधी मिळाली तर भाग घेतात. महिलांनाही भाग घेता येईल अशा जागेचे व वेळेचे भान इतरांनी

ठेवावे लागते. सर्वसामान्यपणे अभ्यासाची, म्हणजेच कीस काढण्याची, आवड असलेल्या गावातील महिला व पुरुषांची संख्या समान आहे.

**प्रश्न ८ – अभ्यास मंडळाचे काम कोणते?**

**उत्तर –** गावाच्या दृष्टीने असे महत्त्वाचे मुद्दे की ज्यांच्यावर ग्रामसभेमध्ये निर्णय घ्यायचा आहे, त्यांच्यावर चर्चा करून, कीस काढून, बारीक बारीक शंका काढून व त्यांचे निरसन करून अभ्यास करणे व त्यांची चर्चा वेगवेगळ्या मोहल्ल्यांत, कुटुंबांत, कामाच्या जागी, कोणत्याही कार्यक्रमात, पानटपरीवर, चौकात, देवळात, नदी-घाटावर, विहीर-तलावावर, हॉटेलात, जंगलात, शेतात – जिथे संधी मिळेल तिथे चालविणे.

**प्रश्न ९ – अभ्यास मंडळ दर महिन्यातून, आठवड्यातून नियमित बसते काय? दिवसा की रात्री, कुठे, किती वेळ बसतात? बैठकीची माहिती कोण देतो?**

**उत्तर –** अभ्यास मंडळ महिन्यातून किंवा आठवड्यातून नियमित बसणे आवश्यक नाही. गरजेप्रमाणे केव्हाही कितीही वेळ बसू शकते. सोयीनुसार कुठेही, पण आवड असणाऱ्या कुणालाही येता येईल अशा जागी बसले पाहिजे. कुणाचीही नियमित बोलावण्याची जबाबदारी नाही.

पहिल्या बैठकीतच पुढच्या बैठकीची तारीख, जागा, वेळ ठरवलेली नसेल तर ज्याला विषय सुचेल किंवा माहिती होईल, तो मिळेल त्या इतर आवड असणाऱ्यांना सांगतो व मग ते आणखी लोकांना सांगतात.

**प्रश्न १० – विषय कसे निवडतात? अभ्यास मंडळ कोण चालवतो?**

**उत्तर –** गावाच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आपोआपच समोर येतो. किंवा सर्वजण मिळून आवडीनेही विषय ठरवू शकतात. कुणा एकावर अभ्यास मंडळ चालविण्याची जबाबदारी नाही. जो विषय आहे त्यालाच धरून चर्चा कशी होईल, त्यासाठी जास्तीत जास्त प्रश्न कसे निर्माण होतील, त्या प्रश्नांना धरून उत्तर शोधण्यात सर्व जण कसे सहभागी होतील, एकच जण जास्त वेळ न बोलता सर्वांनाच कशी समान संधी मिळेल, घेतलेल्या विषयाचा सर्व बाजूने विचार होऊन चर्चा अधिक खोलात कशी जाईल, या सर्व गोष्टींची काळजी सर्वांनी मिळूनच घ्यायची असते.

## गावसमाज सभेचे कामकाज

**प्रश्न ११ – ग्रामपंचायतीची ग्रामसभा व गावाची ग्रामसभा यांत काय फरक आहे? त्यासाठी कोरमची आवश्यकता आहे काय?**

**उत्तर** – ग्रामपंचायतीच्या सर्व मतदारांची मिळून बनते ती ग्रामपंचायतीची ग्रामसभा. मेंढा (लेखा) हे गाव लेखा या गट-ग्रामपंचायतीचा एक भाग आहे. मेंढा, लेखा व कन्हारटोला ही तीन गावे मिळून लेखा गट ग्रामपंचायत बनते. ग्रामपंचायत अधिनियमामधील व्याख्येप्रमाणे या तिन्ही गावांतील सर्व मतदारांची जी सभा ती ग्रामपंचायतीची ग्रामसभा. मेंढा (लेखा) या एकाच घटक गावातील १८ वर्षे किंवा त्यावरील वय असलेल्या सर्व स्त्री-पुरुषांची मिळून बनते ती 'गावाची ग्रामसभा'. किंवा तिला 'गावसमाज सभा' असा वेगळा शब्द वापरणे योग्य होईल. मेंढा (लेखा) गावाच्या ग्रामसभेसाठी किंवा गावसमाज सभेसाठी प्रत्येक कुटुंबातून कमीत कमी एक पुरुष व एक स्त्री मतदार यांनी हजर असणे हा कोरम आवश्यक आहे. ज्या कुटुंबात फक्त स्त्रियाच आहेत त्या कुटुंबातून पुरुषाचे येणे किंवा ज्या कुटुंबात फक्त पुरुषच आहेत त्या कुटुंबातून स्त्रीचे येणे अर्थातच अपेक्षित नाही. एखाद्या वेळेला कुणाला योग्य अडचणीमुळे किंवा दुसऱ्या अतिमहत्त्वाच्या कामामुळे गावसमाज सभेला हजर राहणे शक्य नसेल तर गावसमाज सभा अध्यक्ष किंवा महिला मंडळ अध्यक्ष यांना सांगून तो गैरहजर राहू शकतो. योग्य कारण नसताना गैरहजर राहिल्यास त्याला गावसमाज सभेने ठरविलेला दंड पुढच्या गावसमाज बैठकीच्या आधी गावफंडात जमा करावा लागेल, असा नियम आहे.

**प्रश्न १२ – गावसमाज सभेची सूचना कोण देतो? गावसमाज सभेचा अध्यक्ष कोण असतो? महिला सुद्धा अध्यक्ष राहू शकते काय?**

**उत्तर** – आधीच्याच बैठकीत पुढच्या बैठकीची तारीख ठरली तर सभेची सूचना पुन्हा देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. पण तशी तारीख ठरलेली नसेल तर अभ्यास मंडळात चर्चा होऊन कोणत्या विषयावर व केव्हा गावसमाज सभा बोलवावी ते ठरते आणि त्याप्रमाणे गावपुजारी सर्वांना आवाज देऊन सूचना देतो; किंवा अभ्यास मंडळ, युवक मंडळ किंवा अन्य कुणालाही सूचना देण्याची जबाबदारी सोपवू शकतात. गावसमाज सभेचा कायमस्वरूपी अध्यक्ष कुणीही

नसतो. सभेच्या सुरुवातीला उपस्थित असलेल्यांमधून कुणाही योग्य स्त्री किंवा पुरुषाला सर्वसहमतीने त्या सभेपुरता अध्यक्ष निवडतात. आजपर्यंत अनेकदा महिलांना सुद्धा गावसमाज सभेचा अध्यक्ष म्हणून निवडले आहे.

**प्रश्न १३ – गावसमाज सभेत पुरुष मंडळी महिलांना बोलू देतात काय? महिला आपले मत स्वतः मांडतात काय? महिलांनी मांडलेल्या मताची गावसमाज सभा दखल घेते काय?**

**उत्तर –** होय. इतकेच नव्हे तर, गावसमाज सभेत महिलांनीही बोलावे याकरिता विशेष काळजी घेण्यात येते. बोलणाऱ्या महिलेला एखादा पुरुष बोलू देत नसेल तर बाकी पुरुष त्याला विरोध करून महिलेला बोलण्यास प्रोत्साहन देतात. काही महिला आपले मत स्वत:होऊन मांडतात. पण ज्या स्वत:होऊन आपले मत मांडत नाहीत, त्यांना बोलण्याची संधी देऊन प्रोत्साहन देण्यात येते. स्त्री असो की पुरुष, त्यांनी मांडलेला मुद्दा योग्य असेल तर गावसमाज सभा त्याची दखल नक्कीच घेते. महिलांनी मांडलेला मुद्दा आहे म्हणून दखल घेतली नाही, असे होत नाही.

**प्रश्न १४ – सर्वसाधारणपणे गावसमाज सभेत किती टक्के लोक उपस्थित राहतात?**

**उत्तर –** कमीत कमी पन्नास टक्के पासून तर जास्तीत जास्त शंभर टक्के पर्यंत उपस्थिती असते. पुरुषांपेक्षा महिलांची उपस्थिती नेहमीच जास्त असते.

**प्रश्न १५ – गावसमाज सभेत निर्णय कसे घेतात?**

**उत्तर –** सर्व लोक चर्चा करून, सर्वांचे मत घेऊन सर्वसहमतीनेच निर्णय घेतात. कोणतीही व्यक्ती – मग ती स्त्री असो की पुरुष, गरीब असो की श्रीमंत – सहमत नसेल तर तिच्यावर निर्णय लादत नाहीत. त्या व्यक्तीचे म्हणणेही कदाचित बरोबर असेल असे मानून सर्वसहमती होईपर्यंत चर्चा सुरू राहते. या गावसमाज सभेत निर्णय होऊ शकला नाही तर त्यावर अभ्यास मंडळात पुन्हा चर्चा होते व पुढच्या गावसमाज सभेत पुन्हा चर्चा सुरू राहू शकते. कोणत्याही परिस्थितीत बहुमताने निर्णय घेत नाहीत.

**प्रश्न १६ – गावसमाज सभेत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी कोण करतात? कसे करतात?**

**उत्तर –** निर्णय घेतानाच त्याची अंमलबजावणी कोण व कशी करेल हे सुद्धा ठरवून

घेतात. उदाहरणार्थ – नाली बांधकाम असेल तर ते काम बांधकाम समिती करेल, वनातील काम असेल तर संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडे ती जबाबदारी राहील, इत्यादी.

**प्रश्न १७ – गावसमाज सभेच्या अशा एकूण किती व कोणत्या समित्या आहेत?**

उत्तर –

- संयुक्त वन व्यवस्थापन समिती
- न्याय समिती
- आरोग्य समिती
- महिला समिती
- युवक-युवती किंवा गोटूल समिती
- स्वच्छता समिती
- बांधकाम समिती
- धान्यकोष समिती
- शिक्षण समिती
- पाणी-वाटप समिती
- गाव फंड समिती
- कृषी समिती

**प्रश्न १८ – गावसमाज सभेत योग्य लाभार्थ्याची निवड कशी करतात? निवड झालेल्या व्यक्तीला योग्य पद्धतीने लाभ मिळतो काय?**

उत्तर – सर्वजण योग्य लाभार्थ्याचे नाव सुचवतात. आलेल्या नावांतून तपासणी करून लाभार्थ्याची निवड सर्वसहमतीने निर्णय घेऊन करण्यात येते. योग्य लाभार्थ्याला लाभ मिळाला नाही तर त्यावर अभ्यास मंडळात चर्चा करून अडचणी दूर करण्याकरिता लाभार्थ्याला मार्गदर्शन करतात. गरज पडली तर गावसमाज सभेतर्फे लाभार्थ्यासोबत संबंधित विभागाच्या कार्यालयात कोण जाईल तेही ठरवून पुढील कार्यवाहीचा लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा करतात.

**"दिल्ली-मुंबईत आमचे सरकार !**
**आमच्या गावात आम्हीच सरकार !!"**

**प्रश्न १९ – मेंढा गावची ही घोषणा ऐकण्यात येते. या घोषणेचा अर्थ काय? ही घोषणा कुणी दिली व कुणाच्या प्रेरणेने?**

उत्तर – आमच्या गावासंबंधी काही ठरवायचे असेल, निर्णय घ्यायचा असेल तर गावातील आम्ही सर्व प्रौढ स्त्री-पुरुष मिळूनच ठरवू, आमच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही प्रतिनिधीला न देता तो आम्हीच वापरू; म्हणजे – 'आमच्या गावात आम्हीच सरकार.' पण एकापेक्षा जास्त गावांचा किंवा जिल्हा,

राज्य व देशाचा प्रश्न असेल तर त्यासाठी आमच्या प्रतिनिधीला अधिकार देऊ. म्हणजेच – 'दिल्ली-मुंबईत आमचे सरकार'.

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड भागात राहणाऱ्या एका सर्वसामान्य माडिया गोंड आदिवासी माणसाने या घोषणेची प्रेरणा दिली, व त्याच्या प्रेरणेने २० गावांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत पहिल्यांदा ही घोषणा देण्यात आली. त्या भागात तेव्हा (१९८८) काम करीत असलेले लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा चे कार्यकर्ते श्री. मुकुंद दीक्षित यांचेकडून मेंढा (लेखा) गावाला ही घोषणा कळली व मेंढा (लेखा) च्या गावसमाज सभेने ती अंमलात आणली.

**प्रश्न २० – तुम्ही 'आम्हीच सरकार' म्हणता; तर मग राज्य व केंद्र सरकारच्या योजना व पैसा घेता की नाही घेत?**

**उत्तर –** आम्ही प्रतिनिधी निवडून देतो, त्यांतूनच राज्य व केंद्र सरकार बनते. त्यांचा पैसा म्हणजे जनतेचाच पैसा आहे. तुम्ही आमची घोषणा नीट पूर्ण लक्षात घेतली नाही. आम्ही मानतो की दिल्ली-मुंबईचे सरकार आमच्या मतदानाने निवडून येते म्हणून ते आमचे आहेच. त्यामुळे त्यांच्या योजना व पैशावरही आमचा हक्क आहे. आमच्या गावाच्या वाट्याचा पूर्ण पैसा गावापर्यंत येऊन योग्य प्रकारे कसा खर्च होईल हे पाहणे सुद्धा 'आम्हीच सरकार'चे म्हणजे सर्वसहमतीने निर्णय घेणाऱ्या आमच्या गावसमाज सभेचे कर्तव्य आहे.

**प्रश्न २१ – सरकारी अधिकारी व कर्मचारी गाव सरकारचे मानतात काय?**

**उत्तर –** सुरुवातीला गैरसमज असल्यामुळे सरकारी अधिकारी व कर्मचारी विरोध करायचे. पण सर्वसहमतीने अभ्यासपूर्ण निर्णय घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या गावसमाज सभेच्या गुणवत्तेचा अनुभव आल्यावर भ्रष्ट नसलेले कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी व कर्मचारी गाव-सरकारचे फक्त मानतच नाहीत, तर समर्थनही करतात.

**प्रश्न २२ – 'आमच्या गावात आम्हीच सरकार'चे कायदे व नियम कुणी, कसे बनवले आहेत? कोणत्या आधाराने?**

**उत्तर –** कायदे व नियम बनविण्यासाठी भारतीय संविधानाने पुढीलप्रमाणे व्यवस्था स्वीकारलेली आहे असे आम्ही मानतो –

- देशासाठी लोकसभा

- राज्यासाठी विधानसभा
- ग्रामपंचायतीसाठी ग्रामसभा
- गाव व मोहल्ल्यासाठी गाव/मोहल्ला-समाज सभा

त्यामुळे आपल्या गाव, टोला, पाडा, मोहल्ला यासाठी कायदे व नियम बनविण्याचा खरा अधिकार सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची मिळून बनलेल्या व सर्वसहमतीने निर्णय घेणाऱ्या गावसमाज सभेचाच आहे. त्यानुसार मेंढा (लेखा) च्या गावसमाज सभेने आपल्या स्वत:साठी कायदे व नियम बनविले आहेत.

**प्रश्न २३ – मेंढा (लेखा) गावसमाज सभेने सर्वसहमतीने बनविलेले कायदे व नियम काय आहेत?**

**उत्तर –** ○ फळे, फुले, पाने, शहद इ.करिता झाड बुडापासून तोडू नये. तसेच त्याकरिता त्या झाडाच्या मोठ्या फांद्या सुद्धा तोडू नयेत. असे केल्यास करणाऱ्याला गावसमाज सभा ठरवेल तो दंड गाव फंडात जमा करावा लागेल.

○ गावात दारू काढून किंवा बाहेरून आणून विकणे व विकत घेऊन पिणे याला सक्त मनाई आहे. विकणाऱ्याला पहिल्यांदा सापडल्यास १५१ रु. व विकत घेऊन पिणाऱ्याला पहिल्यांदा ५१ रु.; तसेच बाहेरून दारू पिऊन गावात येऊन झगडा-भांडण व आरडाओरडा किंवा गोंधळ करणाऱ्याला पहिल्यांदा ५१ रु. दंड गाव फंडात जमा करावा लागेल. तोच गुन्हा दुसऱ्यांदा केल्यास दंडाची रक्कम दुप्पट होईल. आवश्यक विशेष कार्यक्रमात रीतिरिवाज व परंपरेप्रमाणे मान्य असलेली दारू गावसमाज सभेची पूर्वपरवानगी घेऊनच काढता व वापरता येईल.

○ गावाबाहेरील राज्य सरकार, केंद्र सरकार, ठेकेदार, स्वयंसेवी संस्था इ. कुणीही असो, त्यांना जर आमच्या गावहद्दीत काही काम करायचे असेल तर ते गावसमाज सभेच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. पूर्वपरवानगी न घेता जोरजबरदस्तीने ते काम करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अहिंसेच्या पद्धतीने आम्ही विरोध करू.

○ गावाचा कारभार सर्वसहमतीने चालविण्यासाठी आम्ही गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुष प्रयत्न करू.

○ व्यक्तीची अडचण ती गावाची अडचण व गावाची अडचण ती व्यक्तीची अडचण, असे आम्ही सर्व गावकरी मानू.

○ गावातील झगडा-भांडणतंटे गावातच गावसमाज सभेच्या माध्यमातून सर्वसहमतीने निर्णय घेऊन मिटवू. गावसमाज सभेच्या परवानगीशिवाय पोलीस स्टेशनला रिपोर्ट देणार नाही, किंवा बाहेरील कोर्टात केस दाखल करणार नाही.

○ शासकीय योजनांतील लाभार्थ्यांची निवड गावसमाज सभेतच करण्यात यावी.

○ आम्ही सबसिडी घेणार नाही. सरकारकडून मिळालेली सबसिडी गावसमाज सभेकडून आम्हाला मिळालेले कर्ज आहे असे मानून लाभ मिळाल्यावर ते गावसमाज सभेला परत करू.

○ आपले अडलेले काम करून घेण्यासाठी कुणालाही लाच म्हणून पैसे, धान्य किंवा वस्तू द्यायला मनाई नाही. फक्त त्याची पावती घेणे आवश्यक आहे. पावती न घेतल्यास तितकीच रक्कम, धान्य, वस्तू गावसमाज सभेत जमा करावे लागेल.

○ गावात कुणीही येवो, आपल्या स्वतःच्या कामाचे नुकसान करून कुणीही जाऊ नये. त्याला तुम्हालाच भेटायचे असल्यास तोच तुमच्याकडे येईल. तेव्हा आपले काम न थांबवता त्याच्याशी बोलणे शक्य असल्यास बोलावे किंवा काम पूर्ण होईपर्यंत थांबण्यास सांगावे. गावातील ज्या कुणास फुरसत असेल त्यांनीच पाहुण्यांना भेटायला जावे.

○ पाहुण्यांच्या व्यवस्थेकरिता जे कुणी गावकरी काम करतील त्यांना त्या कामाची योग्य मजुरी देण्याची जबाबदारी गावसमाज सभेची आहे.

○ प्रत्येक कुटुंबातून कमीत कमी एक व्यक्ती श्रमदान करायला तयार असेल किंवा कामाचा समान वाटा उचलायला प्रत्येक कुटुंब तयार असेल तेव्हाच श्रमदानाने ते काम करावे. तशी तयारी नसल्यास काही व्यक्ती किंवा कुटुंबांनीच श्रमदान करावे असा निर्णय घेऊ नये.

○ प्राकृतिक संसाधनांवर प्रत्येक मानवाचा इतर सजीवांसोबत समान हक्क आहे. जीवनाचा आधार असलेल्या या प्राकृतिक संसाधनांना नष्ट न करता त्यांचा आम्ही उपयोग करू.

○ जमीन कोणाचीही असो, त्यावरील किंवा त्याखालील पाणी व्यक्तीचे नसून गावसमाजाचे आहे व प्रत्येक व्यक्तीचा त्या पाण्यावर समान हक्क आहे.

## गाव फंड

**प्रश्न २४ – गाव फंड कुणी तयार केला? तयार करण्यास कोणी सांगितले? लोकांचा विश्वास टिकून राहील अशी गाव फंडाची व्यवस्था कशी ठेवता?**

**उत्तर** – गाव फंड गावसमाज सभेनेच तयार केला. कुणीही असे करायला सांगितले नाही. पूर्वीपासूनच गाव फंड जमा करण्याची पद्धत होती, पण त्याची योग्य व्यवस्था नसल्याने लोकांचा विश्वास नव्हता. अभ्यास मंडळात चर्चा करून गाव फंडाची नवी व्यवस्था गावसमाज सभेने ठरवली, जी आजही सुरू आहे. ती अशी –

○ भारतीय स्टेट बँक, धानोरा येथे 'ग्रामसभा, मेंढा (लेखा)' च्या नावाने खाते उघडण्यात आले.

○ बँक खातेदार क्र. १ व बँक खातेदार क्र. २ यांना सह्या करण्याचा अधिकार देण्यात आला.

○ पासबुक ठेवण्याचा व गावसमाज सभेच्या निर्णयाप्रमाणे पैसे काढायला बँक खातेदार क्र. १ व २ कडे देऊन परत आपल्या ताब्यात घेऊन ठेवण्याचा अधिकार तिसऱ्याच व्यक्तीकडे दिलेला आहे.

○ पैसे काढणारे खर्च करू शकत नाहीत. खर्च कोण करेल ते गावसमाज सभा ठरवते.

○ खर्च करणारा हिशोब लिहीत नाही. त्यासाठी वेगळ्याच व्यक्तीला जबाबदारी दिलेली आहे.

ही व्यवस्था गेली अनेक वर्षे चांगल्या प्रकारे काम करीत असून तिच्यावरचा लोकांचा विश्वास फक्त टिकलाच नाही, तर वाढला आहे.

**प्रश्न २५ – गाव फंडात कोण किती योगदान करतो?**

**उत्तर** – प्रत्येकजण उत्पन्नाच्या १० टक्के भाग धान्य किंवा पैशाच्या रूपात गाव फंडात जमा करतो.

**प्रश्न २६ – गाव फंडाचा उपयोग कसा करता?**

**उत्तर** – गावच्या उपयोगाच्या वस्तू घेण्यासाठी, गावच्या विकासाच्या कामासाठी, गावातील लोकांना मदत करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, अशा अनेक प्रकारे, सर्वसहमतीने निर्णय घेऊन गाव फंडाचा उपयोग केला जातो.

## ग्रामदान

**प्रश्न २७ – गावसमाज मजबूत करण्यासाठी आणखी काय करण्याचा विचार करीत आहात?**

**उत्तर** – त्यासाठी गावात ग्रामदान करण्याबाबत चर्चा सुरू आहे.

**प्रश्न २८ – ग्रामदान म्हणजे काय?**

**उत्तर** – व्यक्तीच्या नावावर असलेली जमीन गावाच्या नावाने करणे, त्यापैकी विसावा हिस्सा भूमिहीनांना वाटप करून उरलेली जमीन ज्याची त्यानेच कसणे; कसण्याचा हक्क राहील, पण गावाबाहेर विकण्याची परवानगी राहणार नाही; जो मेहनत करायला तयार आहे, पण कसायला जमीन नाही, असा कुणीही गावात राहू नये; उत्पन्नातून चाळीसावा हिस्सा गाव फंडात जमा करणे; गावाचे ग्राममंडळ बनवून गावाचा कारभार गावानेच ग्राममंडळाच्या (अर्थात् गावसमाज सभेच्या) माध्यमातून सर्वसहमतीने निर्णय घेऊन चालविणे – हा ग्रामदानाचा अर्थ आहे.

**प्रश्न २९ – ग्रामदानाची माहिती कुणाकडून मिळाली?**

**उत्तर** – ग्रामदान अभ्यास मंडळाकडून ही माहिती मिळाली.

**प्रश्न ३० – ग्रामदानाचा कायदा आहे काय? मेंढा (लेखा) गाव त्यासंबंधात काय करीत आहे?**

**उत्तर** – हो ! कायदा आहे. या कायद्याचे नाव 'महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४' असे आहे. गावातील ७५ टक्के लोकांनी संकल्पपत्र भरून दिले तरी ग्रामदान होऊ शकते. परंतु हा बहुमताचा निर्णय झाल्यास अडचणी निर्माण होतील, म्हणून जोपर्यंत सर्वसहमती होत नाही तोपर्यंत ग्रामदान घोषित करायचे नाही, असा निर्णय मेंढा (लेखा) च्या गावसमाज सभेने घेतला आहे. वारंवार यासंबंधात अभ्यास मंडळात चर्चा करून सर्वसहमती व्हावी असा प्रयत्न सुरू आहे. ७५ ते ८० टक्के लोक ग्रामदान व्हावे याकरिता तयार आहेत, पण उरलेल्या २० ते २५ टक्के लोकांसाठी ते थांबले आहेत.

**प्रश्न ३१ – ग्रामदानाचा फायदा काय?**

**उत्तर** – विखुरलेले, असंघटित गाव संघटित होऊन एक कुटुंब बनते. जमिनीला मिळालेले व्यक्तिगत संपत्तीचे रूप नष्ट होऊन उत्पादनाचे साधन हे खरे रूप मिळण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

## जंगल, ग्रामवन आणि संयुक्त वन-व्यवस्थापन समिती

**प्रश्न ३२ – जंगलावर अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी तुम्ही काय करीत आहात?**

उत्तर – 'ग्रामवन' तरतूद गावाला लागू व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

**प्रश्न ३३ – ग्रामवन म्हणजे काय?**

उत्तर – भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २८ प्रमाणे गावासभोवतालचे जंगल ग्रामवन घोषित करून शासनाने ते व्यवस्थापनासाठी गावसमाजाच्या ताब्यात देणे म्हणजे ग्रामवन.

**प्रश्न ३४ – ग्रामवनाचा फायदा काय?**

उत्तर – गावाला लागून असलेल्या वनाचे व्यवस्थापन करण्याचा पूर्ण अधिकार गावसमाजाला कायद्याने प्राप्त होतो. जो जास्त जबाबदारी घेईल त्याला जास्त लाभ हे तत्त्व अंमलात येते.

**प्रश्न ३५ – संयुक्त वनव्यवस्थापन (जे.एफ्.एम्) व ग्रामवन यांत काय फरक आहे?**

उत्तर – जे.एफ्.एम् मध्ये जास्त अधिकार वन-विभागाकडे तर ग्रामवन मध्ये ते गावसमाजाकडे, असा मुख्य फरक आहे. शिवाय जे.एफ्.एम्. चा कायदा नाही, तो फक्त शासकीय निर्णय (जी.आर.) आहे; तर ग्रामवन कायद्याने निर्माण होणारी व्यवस्था आहे.

**प्रश्न ३६ – संयुक्त वन-व्यवस्थापन समिती बनविण्याची गरज कां वाटली? कुणी सांगितले? केव्हा व कशी बनवली?**

उत्तर – गावहद्दीतील निस्तार हक्काच्या जंगलाचे संरक्षण गावकरी स्वयंप्रेरणेने आधीपासूनच करीत होते. परंतु त्यासाठी काही समिती वगैरे बनवली नव्हती. महाराष्ट्र शासनाच्या 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' या कार्यक्रमाची माहिती 'वृक्षमित्र' संस्थेकडून मिळाली. १६ मार्च १९९२ च्या शासकीय निर्णयाचा गावातील अभ्यास मंडळात सखोल अभ्यास करण्यात आला. गावकरी गावापुरते आपल्या जंगलाचे व्यवस्थापन करण्यास सक्षम होते, परंतु बाहेरील वन-गुन्हेगार किंवा इतर गावांचे आक्रमण यांचेशी सामना देण्यासाठी गावाला शासनाच्या वन

विभागाची साथ आवश्यक होती. वनकामातून रोजगार-निर्मिती व वन-आधारित विकास यासाठी आवश्यक निधी व अन्य मदतीसाठी सुद्धा वन विभागाचे सहकार्य आवश्यक आहे असे गावाला वाटले, व गावसमाज सभेने शासनाच्या या कार्यक्रमात सहभागी होऊन वन विभागासोबत मिळून संयुक्त वनव्यवस्थापन समिती बनविण्याचा निर्णय घेतला.

शासकीय निर्णयाप्रमाणे समिती स्थापन करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ठरावाची आवश्यकता होती. तसा ठराव जोडून गावाने उप-वनसंरक्षक, गडचिरोली यांचेकडे अर्ज केला व 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' या शासकीय कार्यक्रमात गावाला सहभागी करून घ्यावे अशी विनंती केली. तेव्हाच्या उप-वनसंरक्षकांनी गावाला सांगितले की हा कार्यक्रम फक्त अपगत व अवनत वनक्षेत्राकरिताच, म्हणजे जिथे खराब जंगल आहे तिथेच, राबवायचा आहे; तुमचे जंगल चांगले असल्यामुळे तुम्हाला या कार्यक्रमात सहभागी करून घेता येणार नाही. त्यावर गावातील अभ्यास मंडळाने 'वृक्षमित्र' संस्थेच्या मदतीने पुन्हा एकदा शासकीय निर्णयाचा बारकाईने अभ्यास केला. हा कार्यक्रम कुठे राबवावा, यासंबंधात शासकीय निर्णयात असलेली तरतूद अशी आहे – "ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत वन व वनेतर क्षेत्राचा उपयोग या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने केला जाईल." यातील 'प्रामुख्याने' या शब्दाचा काय अर्थ होतो याचा कीस काढण्यात आला. गावकऱ्यांनी उप-वनसंरक्षकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की चांगल्या वनक्षेत्रातही हा कार्यक्रम राबवावा असाच शासकीय निर्णयातील तरतुदीचा अर्थ आहे. महाराष्ट्र राज्यात अपगत व अवनत वन जास्त असल्यामुळे प्रामुख्याने तो तिथे राबवावा याचा अर्थ, चांगल्या वनात राबवू नये असा होत नाही. उलट, प्रामुख्याने नसला तरी तो चांगल्या वनक्षेत्रातही राबवायचा कार्यक्रम आहे, असाच त्याचा अर्थ होतो. परंतु साहेब मानायला तयार नव्हते. शेवटी गावकऱ्यांनी रामबाण उपाय काढला. त्यांनी साहेबांना सरळच सांगून टाकले की "आमचे जंगल आम्ही आतापर्यंत राखून चांगले ठेवले, या कारणासाठीच फक्त हा कार्यक्रम इथे राबवता येत नाही असे असेल तर तसे लिहून द्या ! व पंधरा दिवसांनी पुन्हा परत या. तोपर्यंत आम्ही या चांगल्या जंगलाला खराब करून ठेवतो. मग तर तुम्हाला हा कार्यक्रम आमच्या इथे राबवायला काही अडचण राहणार नाही ना !" दरम्यान त्या उप-वनसंरक्षकांची बदली होऊन

त्यांचे जागी तरुण तडफदार नवे उप-वनसंरक्षक श्री. अनूप वाधवा हे रुजू झाले. त्यांना जेव्हा हे प्रकरण कळले तेव्हा त्यांनी गावात येऊन गावसमाज सभेत गावकऱ्यांशी बोलण्याचा निर्णय घेतला. गावाचे म्हणणे त्यांनी मान्य केले व दि. ३-८-१९९२ रोजी 'संयुक्त वनव्यवस्थापन समिती, मेंढा (लेखा)' ची स्थापना झाली.

**प्रश्न ३७ – समिती गावाची आहे की वन विभागाची आहे?**

**उत्तर** – समिती तर गावाचीच आहे; पण कामाच्या गरजेनुसार ती गाव व वन विभाग यांनी मिळून संयुक्तपणे बनविली आहे.

**प्रश्न ३८ – समितीचे सदस्य कोण व किती आहेत? सदस्यांची निवड कोण व कशी करतात? अध्यक्ष व सचिवाची निवड कोण व कशी करतात? समितीचा कार्यकाल किती असतो?**

**उत्तर** – या कार्यक्रमात समिती म्हणजे गावातील प्रत्येक कुटुंबातील प्रतिनिधींची मिळून बनते ती सर्वसाधारण समिती. या समितीमध्ये प्रत्येक कुटुंबातून एक पुरुष व एक स्त्री सदस्य आहेत. मेंढा (लेखा) गावात आज (मार्च २००७) एकूण ८४ कुटुंबे असून त्यातील दोन कुटुंबांत कुणीच पुरुष सदस्य नाहीत. संयुक्त वन-व्यवस्थापन समिती, मेंढा (लेखा)' मधे ८४ स्त्रिया व ८२ पुरुष असे एकूण १६६ सदस्य आहेत. प्रत्येक कुटुंबातून कोण पुरुष व स्त्री प्रतिनिधी सदस्य म्हणून राहतील याची निवड ते कुटुंबच करते. सदस्यांच्या नावांना अंतिम मंजुरी संयुक्त वन-व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा देते. सर्वसाधारण समितीचे सर्व सदस्य निवडणुकीद्वारे अध्यक्षाची निवड करतात. सचिव हे संबंधित वनक्षेत्राचे वनपाल किंवा वनरक्षक हे पदसिद्ध असतात. सर्वसाधारण समिती ही कायमस्वरूपी आहे. अध्यक्षाचा कार्यकाल मात्र तीन वर्षांचा असतो.

**प्रश्न ३९ – जंगल-गस्त कशी घालता? त्यात प्रत्येक कुटुंबातून महिला-पुरुष सहभागी होतात काय?**

**उत्तर** – दररोज गावातील चार कुटुंबांचे प्रत्येकी एक स्त्री किंवा पुरुष प्रतिनिधी असे चार जण जंगल-गस्त घालण्यासाठी जातात. चारपैकी दोन व्यक्ती एका बाजूने व दोन व्यक्ती दुसऱ्या बाजूने जंगलात जाऊन गस्त घालतात. सकाळी जेवण करून जातात व सायंकाळी पाचच्या सुमारास परत येतात. गावात परत

आल्यावर, पुढच्या दिवशी कोणत्या कुटुंबांतील लोकांनी गस्त घालण्यासाठी जायचे आहे याची सूचना त्या कुटुंबांना देतात. यांत प्रत्येक कुटुंबातून महिला-पुरुष सहभागी होतात.

**प्रश्न ४० – जंगलातून गरजेपुरता निस्तार (जीवनावश्यक गरजेच्या वस्तू) मिळतो काय? समितीने जंगलाचे नियम बनविले आहेत काय? नियम कोण व कसे बनवितात? नियमभंग करणाऱ्यांना काय करता? नियमांना विरोध करणाऱ्यांना कसे समजावता?**

उत्तर – होय ! जंगलातून गरजेपुरता निस्तार मिळतो. समितीने जंगलातूनं निस्तार घेण्याबाबतचे नियम बनविलेले आहेत. नियमाबाबत आधी अभ्यास मंडळात चर्चा होते. अंतिम मंजुरी समितीच्या सर्वसाधारण सभेत देण्यात येते. नियमभंग करणाऱ्यांना दंड केल्या जातो. नियमांना विरोध करणाऱ्याकडून, तो विरोध कां करीत आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याने सांगितलेले विरोधाचे कारण योग्य आहे की अयोग्य यावर अभ्यास मंडळात चर्चा होते. त्यानें सांगितलेले कारण योग्य असेल तर त्याप्रमाणे नियम बदलवण्याची प्रक्रिया सुरू करतो. पण त्याचे कारण अयोग्य असेल तर तसे त्याला व्यक्तिगत व सामूहिक चर्चेतून समजावून सांगतो.

**प्रश्न ४१ – पूर्वी वन विभागाचे कर्मचारी – गार्ड वगैरे – लोकांकडून पैसे, धान्य, कोंबडी, दारू इ. घेत होते काय? त्यावर तुम्ही काय उपाय शोधले?**

उत्तर – १९८७-८८ पर्यंत आमच्या गावातील लोकही फॉरेस्टवाल्यांना पैसे, धान्य, कोंबडी, दारू इ. देत होते. 'वृक्षमित्र' संस्थेसोबत 'जंगल आणि लोक' या विषयावरील सहभागी अभ्यासाचा एक भाग म्हणून आम्ही गावाच्या अभ्यास मंडळात निस्तार हक्क व त्याच्याशी संबंधित कायद्याचा सखोल अभ्यास केला. तेव्हा आम्हाला समजले की कायद्याने आम्हाला निस्तार हक्क मिळाले असून ते अजूनही कायम आहेत. हे कळल्यावर गावाने गावसमाज सभेत निर्णय घेऊन व तसे गार्डला कळवून पैसे, धान्य, कोंबडी, दारू इ. देणे बंद केले.

**प्रश्न ४२ – समितीच्या ताब्यात असलेले जंगल किती हेक्टर आहे? जंगलावर गावाचा पूर्ण अधिकार आहे काय? वन विभागाचे अधिकारी गावाचे म्हणणे मानतात काय?**

उत्तर – कम्पार्टमेंट नंबर ४६८, ५११, ४६९, ४७० व ४७१ मधील एकूण १८०९.६१ हेक्टर जंगल समितीच्या ताब्यात आहे. संयुक्त वन-व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून या जंगलावर गावाचा पूर्ण अधिकार आहे. समिती बनण्यापूर्वी गाव व वन विभाग एकमेकांना शत्रू समजत होते. पण आता संबंध बदलले असून दोघेही एकमेकांना मदत करतात. एकत्र बसून निर्णय घेतात. गावाचे म्हणणे योग्य असल्यास वन विभागाचे अधिकारी सुद्धा ते मानतात.

**प्रश्न ४३ – जंगलातून लाकूड, बांबू तोडून विकता काय? जंगलापासून गावातील गरजूंना रोजगार मिळतो काय? असल्यास कोणता?**

उत्तर – कुणीही जंगलातून लाकूड, बांबू तोडून विकत नाही. गावसमाज सभेने बनवलेल्या नियमाप्रमाणे स्वतःच्या गरजेपुरते वापरण्याचा, व्यवस्थापनात सहभागी असणाऱ्यांना, हक्क आहे. पण कुणालाही विकण्याची परवानगी नाही. जंगलापासून गरजूंना पुढीलप्रमाणे रोजगार मिळतो – * बांबू-कटाईवर मजुरी, * तेंदूपत्ता, * बीट कटाई, * रोपवनातील कामे, * रोपवाटिकेमधे काम, * मोह, आवळा, चारोळी, गोंद (डिंक), बेहडा, हिरडा, पळसफूल, तरोटा बी, वनऔषधी, टेंभरूची फळे इ. गोळा करणे, * वनक्षेत्रातील मृद् व जल-संधारणाची कामे इ.

**प्रश्न ४४ – जंगल आपल्या गावचे आहे असे सर्वांना वाटते काय? अतिक्रमण व अवैध लाकूड कटाई रोखता काय? या कामात वन विभागाचे अधिकारी मदत करतात काय?**

उत्तर – जंगल आपल्या गावाचे आहे असे सर्वांना वाटते, पण अजूनही सर्वांना तसा आत्मविश्वास किंवा पक्की खात्री वाटत नाही. अतिक्रमण व अवैध लाकूड-कटाई रोखण्याचे काम गावकरी करतात. या कामात वन विभागाचे अधिकारी मदत करतात.

**प्रश्न ४५ – आजूबाजूच्या गावांतील लोकांना गरजेपुरता निस्तार लागल्यास तुमच्या गावाच्या जंगलातून नेऊ देता काय? त्याचे काय नियम आहेत?**

उत्तर – आजूबाजूच्या गावातील लोकांना गरजेपुरता निस्तार लागल्यास त्यांनी तसा अर्ज गावाच्या समितीकडे द्यावा असा नियम ठरलेला आहे. तसा अर्ज न देता व समितीच्या परवानगीशिवाय कुणी जंगलात घुसून तोड केल्यास त्याचा माल जप्त

करून त्या व्यक्तीला दंडही करतो. समितीकडे अर्ज देऊन परवानगी मागितल्यास, मागणाऱ्याला खरोखर किती गरज आहे याची तपासणी केल्यावरच मंजुरी देतात. कोणत्या भागामधून किती माल घ्यावा हे सुद्धा ठरवून दाखवून देतात. माल न्यायच्या दिवशी, नेण्याआधी समितीला सूचना देऊन, परवानगी दिली तितकाच माल नेत आहोत हे दाखवणे आवश्यक असते.

**प्रश्न ४६ – समितीमुळे काय फरक पडला? जंगल वाढले काय?**

**उत्तर** – समितीमुळे गावकरी वन-व्यवस्थापनाच्या कामासाठी एकत्रित बसून विचार करायला लागले. नियम बनवून त्यांचे पालन करू लागले. वन विभागाचे व गावकऱ्यांचे संबंध सुधारून ते एकत्र बसू लागले. रोजगारासाठी कामाचे एकत्रित नियोजन करू लागले. वन विभाग व गावकरी समितीच्या माध्यमातून एकत्रित आल्यामुळे अवैध कटाई व वनचोरीला आळा बसला. आणि जंगल वाढले.

**प्रश्न ४७ – शासन निर्णयानुसार समितीला उत्पन्नातील वाटा म्हणून किती रक्कम मिळाली? त्या रकमेचे काय केले?**

**उत्तर** – अजून उत्पन्नातील समितीच्या वाट्याची रक्कम मिळालेली नाही. प्रयत्न सुरू आहेत. मिळाल्यास ती रक्कम व्यक्तींमध्ये वाटायची नाही, सामूहिक गाव-विकासासाठीच खर्च करायची, असे ठरले आहे.

**प्रश्न ४८ – समितीच्या कामात काय त्रुटी आहेत? आणखी काय सुधारणा झाली पाहिजे असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर** – काही वेळेला ठरविलेल्या वेळेवर काम होत नाही. कामाच्या नियोजनाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

## गावची शेती

**प्रश्न ४९ – सगळ्यांकडे जमीन आहे काय? किती एकरांपासून किती एकरांपर्यंत?**

**उत्तर** – सगळ्यांकडे जमीन आहे. त्यापैकी पाच जणांकडे जुनी अतिक्रमणाची जमीन आहे, पण अजून तिचे पट्टे मिळालेले नाहीत. पट्टे नसले तरी त्या जमिनी त्यांच्या ताब्यात असून ते कसत आहेत. मेंढा (लेखा) गावात फक्त एक कुटुंब असे आहे की ज्यांची मेंढा (लेखा) गावात जमीन नाही. पण त्या कुटुंबाची दुसऱ्या

गावात मालकी हक्काची जमीन असून ती ते कसत आहेत. जमीनधारणा १ एकरापासून १५ एकरांपर्यंत आहे.

**प्रश्न ५० – शेतीत कोणती पिके घेतात?**

**उत्तर –** मुख्य पीक धानाचे घेतात. धानासोबत पाळीवर तुरी लावतात व धान निघाल्यावर मोजके लोक थोडा जवस, चणा, उडीद, कुलथा, पोपट, बरबटी इ. चे पीक घेतात.

**प्रश्न ५१ – एक एकरात किती उत्पन्न येते? वर्षभर खाऊन उरेल इतके उत्पन्न होते काय?**

**उत्तर –** एक एकरात धानाचे उत्पन्न जमीन व पाणी यांच्यानुसार ३ क्विंटल पासून १५ क्विंटल पर्यंत होते. एकूण ८४ कुटुंबांपैकी ५३ कुटुंबांना वर्षभर खाऊन उरेल इतके उत्पन्न होते. बाकी २१ कुटुंबांना मात्र स्वतःचे उत्पन्न वर्षभर पुरेल इतके होत नसल्यामुळे बाहेरून तांदूळ विकत घ्यावे लागतात.

**प्रश्न ५२ – बिजाई कोणती वापरतात? खत कोणते वापरतात?**

**उत्तर –** ५० टक्के लोक गावठी बिजाईच वापरतात. पांढरी लुचाई हा वाण जास्त आवडीचा असून त्यात जड, मझवा आणि हलका असे तीन प्रकार आहेत. पिटे हिडस्क्, काकेरी, लुढका, डोहूर या गावठी जातींचे धान सुद्धा थोड्या प्रमाणात वापरात आहे. बाकी ५० टक्के सरकारी बिजाई – सोनम् जास्त वापरतात. थोड्या प्रमाणात आरआर ६४, एच्एमटी १०१०, पूनम ही वाणेही वापरात आहेत.

**प्रश्न ५३ – एकच पीक दरवर्षी घेतात की त्यात काही फेरपालट करतात?**

**उत्तर –** धानाचे पीक एकच असले तरी दरवर्षी बिजाईचे वाण मात्र बदलतात.

**प्रश्न ५४ – पूर्वीच्या व आताच्या शेती करण्यात काही बदल वाटतो काय?**

**उत्तर –** हो, बदल वाटतो. पूर्वी मोलका (चिखल करून धान फेकून देणे), औत्या (कोरडवाहू जमिनीत पावसाच्या अगोदरच धान फेकणे) अशा पद्धतीनेच जास्त शेती करीत होते. आता ८० ते ९० टक्के लोक रोवणा करतात. त्यामुळे पिकाची मशागत चांगली होऊन उत्पन्नात वाढ झाली आहे.

**प्रश्न ५५ – शेती करण्याच्या पद्धतीत बदल करण्याचा काही विचार सुरू आहे काय?**

**उत्तर –** मागील वर्षी (२००६) गावाने पद्धती बदलण्याच्या दृष्टीने एक वेगळा

प्रयोग करून बघितला. गावातील लक्ष्मी महिला बचत गटाने विचार केला की शेतकऱ्यांचा एक गट ठरवून सर्वांनी एकमेकांचे काम करायचे. कुणीच कुणाला मजुरी द्यायची नाही. सकाळी नांगरणीसाठी जाणाऱ्यांना फ़क्त तो शेतकरी सकाळचे व दुपारचे जेवण देईल. रोवण रोवायला जाणारे स्वतःची सकाळची शिदोरी सोबत आणतील. दुपारचे जेवण किंवा आंबील तो शेतकरी देईल. असे ठरून काम सुरू झाले. याची संपूर्ण गावात चर्चा होऊन सर्वांनी असेच करायचे ठरविले. ७५% काम या पद्धतीने पार पडले. पण नंतरचे २५% मात्र ज्याचे त्याने केले. या प्रयोगातून खालील गोष्टी लक्षात आल्या – * सहकार पद्धतीमुळे प्रत्येकजण दुसऱ्याशी जोडल्या जाऊन संघटन मजबूत झाले व पैशाचीही बचत झाली, * सामूहिक प्रक्रियेत न बसणारे सुद्धा नियोजनात येऊन बसायला लागले, * ज्यांचे रोवणे संपले ते उरलेल्या रोवणाच्या कामावर यायला उत्सुक नव्हते, * रोवणा सारताना प्रत्येकाने वेगळा केल्यास खूप जास्त खर्च होतो, त्याऐवजी एकाच दिवशी पण गटा-गटाने सामूहिकरित्या रोवणा सारण्याचा कार्यक्रम केल्यामुळे पैसा व धान्याची मोठी बचत झाली. हीच पद्धत पुढे सुरू ठेवण्याचा विचार गावाने केला आहे. जुन्या अनुभवापासून शिकून नवीन नियोजन सुरू आहे. १० ते १५ कुटुंबांचा एक गट, असे करायचे ठरले आहे.

**प्रश्न ५६ – शेतीसाठी सिंचनाची सोय आहे काय? पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी काय करीत आहात?**

**उत्तर** – पावसाळ्यात लावलेले धानाचे एक पीक वाचवता येईल इतकी सिंचनाची सोय – गलीप्लग, विहीरी, बोड्या, तलाव यांमुळे – उपलब्ध झाली आहे. पुढे पाणलोट क्षेत्र विकास, बोडी व तलाव खोलीकरण, शेततळी, सामुदायिक विहीरी, लिफ्ट इरिगेशन इ. बाबत विचार सुरू आहे. गावाने आतापर्यंत एका नाल्याच्या वरील भागात १००० पेक्षा जास्त गलीप्लग बांधणे, १७ बोड्यांचे बांधकाम, १ वनतलाव व १ सामूहिक विहीर इतकी कामे पूर्ण केली आहेत.

**प्रश्न ५७ – वन-तलावाचे बांधकाम करताना काही अडचणी आल्या काय? त्यातून गावाने कसा मार्ग काढला?**

**उत्तर** – आज जिथे वनतलाव आहे तिथे तलाव व्हावा अशी गावकऱ्यांची खूप वर्षांपासून इच्छा होती. पण वनसंरक्षण कायदा १९८० मुळे तिथे तलाव होऊ

शकत नव्हता. पण संयुक्त वन-व्यवस्थापन समिती बनल्यावर समितीमार्फत रोजगार हमी योजनेतून वनतलावाचे काम घेण्यात आले. अपुऱ्या बजेटमुळे तलावाचे काम अर्ध्या उंचीपर्यंतच होऊ शकले. उरलेले अर्धे काम कसे पूर्ण करावे यावर अभ्यास मंडळात विचार करून गावाने एक अभिनव प्रयोग केला : 'मासे खा – तलाव बनवा.' अर्ध्या उंचीपर्यंतच्या तलावात पावसाळ्यात पाणी भरल्यावर गावाने मासे बिजाई त्यात सोडली. सहा महिन्यांनी मासे मोठे झाल्यावर संपूर्ण गावाने जाऊन मासे पकडले. मासे विकायचे नाहीत हे आधीच ठरले होते. प्रत्येक कुटुंबात मासे-वाटप करून किती किलो मासे कुणी घेतले ते रजिस्टरमधे लिहून ठेवले. खाल्लेल्या प्रत्येक १ किलो माशाच्या मोबदल्यात त्या कुटुंबाने १ नाली (१० x १० x १ फूट) माती खोदून वनतलावाच्या पाळीवर टाकण्याचे काम केले; व मासे खाऊन आपला अर्धा राहिलेला तलाव पूर्ण करून घेतला.

## सामाजिक परंपरा

**प्रश्न ५८ – गोटूल म्हणजे काय? गोटूलची रचना कशी असते?**

**उत्तर –** गोटूल ही गोंड (कोया = मानव) आदिवासींमधील जीवनशिक्षण देऊन चांगले नागरिक तयार करणारी एक शाळा होती. खऱ्या अर्थाने सर्वांना आनंददायी जीवन-शिक्षण तिथे मिळत होते. किशोर-वयाच्या मुलामुलींपासून तर लग्न होईपर्यंतच्या युवक-युवतींची ती एक जिवंत संघटना होती. गावाच्या सांस्कृतिक संघटनेचे केंद्रही गोटूलच होते. गोटूलचे प्रत्येक गावात एक वेगळे घरही असायचे. सर्व मुले-मुली तिथे जमायचे, खेळायचे, नाचायचे. मोठी मुले-मुली लहानांना शिकवायचे. त्याशिवाय ते गोटूल घर गाव-बैठकीसाठी, तसेच बाहेरून आलेल्या पाहुण्यासाठी तात्पुरते विश्रामगृह म्हणूनही उपयोगात यायचे. गोटूलमध्ये तरुण मुले-मुली एकत्र येतात हे गैर-आदिवासींच्या विकृत नजरेला चांगले वाटले नाही, व त्यांनी तशी टीका सुरू केली. गोंड आदिवासींमधील नवशिक्षित तरुण पिढीवर त्याचा परिणाम होऊन त्यांनी, सुधारणेच्या नावावर, मानवी समाजाला आदर्शवत् असलेली ही सुंदर संस्था व तिचे गावात असलेले घर सुद्धा मोडून टाकले. मेंढा (लेखा) गावसमाजाला अभ्यास मंडळात झालेल्या चर्चांतून ही गोष्ट समजली. १९८९ मध्ये मेंढ्यात गोटूल घर नव्याने बांधण्यात आले. परंतु गोटूल संस्था मात्र तिच्या संपूर्ण वैशिष्ट्यांसह अजून पुनर्जीवित होऊ शकलेली नाही.

**प्रश्न ५९ – लग्न कसे ठरते? कसे होते?**

**उत्तर** – गोटूल संस्था अस्तित्वात होती तेव्हा मुला-मुलींना आपला योग्य जोडीदार निवडण्याची संधी मिळत होती. पण गोटूल तुटल्यावर आता इतर गैर-आदिवासी समाजांप्रमाणे पहायला जाण्याची प्रथा सुरू झाली. गोंड आदिवासींमधे हुंडा पद्धत नव्हती. लग्न मुलाच्या घरी होते व मुलाने मुलीकडच्यांना देज देण्याची पद्धत आहे. परंतु शिक्षण व तथाकथित सुधारणेसोबतच मुलांनी हुंडा मागण्याचे प्रमाण वाढत आहे. लग्नघरी येणारे सर्व नातेवाईक, मित्र, निमंत्रित येताना सोबत तांदूळ, डाळ, लसूण, कांदा, तेल इ. घेऊन येऊन ज्यांच्या घरी लग्न आहे त्यांना सहकार्य करतात. एकट्यावर बोजा पडू देत नाहीत. आतापर्यंत फक्त मुलाकडेच अशी मदत करीत होते, पण यावर्षी (२००७) गावसमाज सभेने मुलाप्रमाणेच मुलीलाही अशी मदत करण्याचा निर्णय सर्वसहमतीने घेतला असून त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे.

**प्रश्न ६० – मुलगा व मुलगी दोघे एकमेकाच्या सहमतीने लग्न करू इच्छितात पण मुलाच्या वडीलांचा विरोध आहे, तर काय होते?**

**उत्तर** – लग्नाला मुलाच्या वडीलांचा विरोध असला तरी गोंड (कोया) आदिवासींमध्ये लग्नाकरिता मुला-मुलीच्या पसंतीलाच अंतिम महत्त्व दिलेले आहे. त्यांना समाजमान्य पद्धतीने लग्न करून मुलाच्या वडीलांच्याच घरात राहता येते. या पद्धतीला 'हैवार दायना' किंवा 'घरघुसी' असे म्हणतात. त्यात मुलगा-मुलगी संगनमत करून ठरवितात व ठरल्याप्रमाणे मुलगी आपल्या आई-वडीलांचे घर सोडून मुलाच्या घरात येऊन घुसते व बसून राहते. मुलाचे वडील त्या मुलीला वाईट वागणूक देऊ शकत नाहीत. अशी मुलगी आली असल्याची सूचना गावसमाजाला द्यावी लागते. त्यापुढे त्या मुलीच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्या गावसमाजाची असते. पूर्ण चौकशी करून शेवटी त्या मुला-मुलीचे लग्न लावून देतात.

## विकासाची पावले

**प्रश्न ६१ – गावच्या विकासासाठी आणखी काय करीत आहात?**

**उत्तर** – गोबरगॅस प्रत्येक घरात केला आहे. त्याला संडास जोडला आहे. सामूहिक पाणी योजनेचे काम चालू आहे. धान्यकोष तयार करीत आहोत. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेत सहभागी झालो आहोत. जैव-विविधतेच्या संदर्भात काम

करीत आहोत.

**प्रश्न ६२ – सरकारी गोबरगॅस अयशस्वी झालेले असतानाही प्रत्येक घरात वेगळा गोबरगॅस बांधून त्याला संडास जोडण्याचा निर्णय कां घेतला?**

**उत्तर** – महिलांना होणारा त्रास कमी करणे, जंगलावर होणारा भार हलका करणे व शेतीला चांगले खत मिळणे, याकरिता हा निर्णय घेतला.

**प्रश्न ६३ – ज्यांच्या घरी शेण देणारी जनावरे नाहीत त्यांच्या घरी बांधलेल्या गोबरगॅससाठी शेणाची काय व्यवस्था गावाने केली आहे?**

**उत्तर** – ज्यांच्या घरी शेण देणारी जनावरे आहेत त्यांनाच फक्त गोबरगॅस देण्याची सरकारी योजना होती. परंतु गावसमाज सभेने आपली योजना बनवताना, ज्यांच्याकडे शेण देणारी जनावरे नाहीत अशांचाही विचार केला. प्रथम अभ्यास मंडळात अभ्यास करून त्यावर उपाय शोधला व सर्वसहमतीने ठरवले की अशा कुटुंबांना गावातील आखर व रस्त्यावर पडलेले शेण मिळेल. आज अशा तीन कुटुंबांत गोबरगॅस चांगल्या प्रकारे सुरू आहे.

**प्रश्न ६४ – सामूहिक पाणी योजनेत पाण्याची मालकी कोणाची राहील?**

**उत्तर** – ज्याची जमीन त्या व्यक्तीची त्यावरील किंवा खालील पाण्यावर मालकी न राहता ती गावसमाजाची राहील, असे गावसमाज सभेने सर्वसहमतीने ठरविले आहे.

**प्रश्न ६५ – सामूहिक पाणी योजना म्हणजे काय?**

**उत्तर** – प्रत्येकाला त्याच्याकडे असलेल्या जमिनीच्या प्रमाणात पाणी न मिळता प्रत्येक व्यक्तीला सारख्या प्रमाणात पाण्याचा हक्क मिळेल अशी पाणी योजना म्हणजे सामूहिक पाणी योजना. या योजनेंत भूमिहीनाला सुद्धा पाण्यावर समान हक्क राहील.

**प्रश्न ६६ – भांडण किंवा वाद झाल्यास न्यायनिवाडा कुठे करणार?**

**उत्तर** – पोलीस स्टेशनात किंवा कोर्टात न जाता गावसमाज सभेतच सर्वसहमतीने न्यायनिवाडा करणार.

**प्रश्न ६७ – सामूहिक पाणी योजनेचे काम किती झाले आहे? ते पूर्ण झाले आहे काय?**

**उत्तर** – फक्त एक मोठी सामूहिक विहीर बांधून झाली आहे. सामूहिक पाणी योजनेचे काम अजून पूर्ण झालेले नाही. मानव विकास मिशनच्या योजनेत आठ

सामूहिक विहीरींचा प्रस्ताव दिलेला आहे. सर्व्हे होऊन खर्चाचा अंदाज (एस्टिमेट) तयार करायचे काम सुरू आहे.

**प्रश्न ६८ – धान्यकोष योजना ही गावाची आहे की सरकारी?**

**उत्तर** – सरकारी योजना यायच्या पाच वर्षे आधीच गावाने धान्यकोष स्वत: निर्णय घेऊन तयार केला होता. शासकीय योजना जाहीर झाल्यावर अधिकारी गावात आले व मेंढा (लेखा) गाव धान्यकोष समितीचे रेकॉर्ड तपासले. गावकोषात असलेले धान्य ३३% धरून ६७% धान्य सरकारकडून मिळाले. समिती वर्षाचे दोन टक्के व्याज घेते. त्यामुळे धान्यकोष वाढत आहे. गावकरी आता बाहेरून धान्यरूपात कर्ज घेत नाहीत. गावातच अत्यल्प व्याज-दरात ते त्यांना उपलब्ध होत असल्याने शोषण थांबले आहे.

**प्रश्न ६९ – यशवंत ग्रामसमृद्धी योजना काय आहे?**

**उत्तर** – ही महाराष्ट्र शासनाची योजना आहे. गावविकासाच्या कामाकरिता १०% रक्कम गावाने जमा केल्यास शासन ९०% रक्कम देते.

**प्रश्न ७० – इतरत्र या योजनेत गावाने भरावयाची लोकसहभागाची १०% रक्कम ठेकेदारच भरतात व मोठ्या प्रमाणात सरकारी अधिकाऱ्यांना लाच दिल्याशिवाय कामच होत नाही; असे असताना मेंढा (लेखा) च्या 'आम्हीच सरकार'चा काय अनुभव आहे?**

**उत्तर** – लोकसहभागाची रक्कम रु. २००००/- खरोखर गावाने भरली. कुणालाही लाच दिली नाही. शासनाच्या सहभागाची रक्कम १ लाख ८० हजार रुपये दीड वर्षांनि मिळाले. काम ग्रामपंचायतीने केले. 'आम्हीच सरकार' ने निगराणीचे काम केले. गावाने या रकमेतून नाली-बांधकाम करायचे ठरविले होते. शासकीय मापदंडानुसार दोन लाख रुपयांत २०० मीटर नाली-बांधकाम झाल्यास चांगले काम झाले, असे मानण्यात येते. मेंढा (लेखा) च्या 'आम्हीच सरकार'च्या निगराणीमुळे १ लाख ८० हजारातच ३५० मीटर, म्हणजे शासकीय मापदंडापेक्षा १७० मीटर जास्त काम, तेही चांगल्या गुणवत्तेचे, झाले; तरी २० हजार रुपये शिल्लक आहेत.

**प्रश्न ७१ – जैव-विविधतेच्या संदर्भात मेंढा (लेखा) गावात काय काम झाले आहे?**

उत्तर – भारत सरकारने २००२ मधे जैव-विविधता कायदा व २००४ मध्ये त्याचे नियम बनवले. त्यांत प्रत्येक गावाची जैव-विविधता व्यवस्थापन समिती असेल व ती गावाचे जैव-विविधता नोंद रजिस्टर (पी.बी.आर.) तयार करेल अशी तरतूद आहे. हे काम गाव कसे करेल यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी भारतीय विज्ञान संस्था, बंगलोर च्या प्रा. माधव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासाचे कामात मेंढा (लेखा) गावही सहभागी झाले होते. गावसहभागाने अभ्यासाचे काम पूर्ण झाले असून लेखा ग्रामपंचायतीने केंद्रीय कायद्यातील तरतुदीनुसार जैव-विविधता व्यवस्थापन समित्या गठित करायची प्रक्रिया नुकतीच सुरू केली आहे.

# मेंढा (लेखा) पासून काय शिकाल आणि शिकून काय कराल ?

– देवाजी नवलू तोफा

(१) कोठलेही काम करण्यासाठी निर्णय घेताना बहुमताने निर्णय घेऊ नये. बहुमताने निर्णय घेतल्यास गावात पार्ट्या निर्माण होतात. दोन गट पडतात. एकमेकाचे पाय ओढण्यात बुद्धी, पैसा व वेळही खर्च होतो, पण हातात काहीही लागत नाही. सर्वसहमतीने निर्णय घेतल्यास गावाची एकजूट होऊन शक्ती निर्माण होते. वेळ व पैसा वाचतो. बुद्धी चांगल्या विचाराकडे लागते. व्यक्तीचा, गावाचा व संपूर्ण मानवसमाजाचाही त्यामुळे फायदा होतो, व माणुसकीचा विकास होतो.

विरोध करणाऱ्या एका व्यक्तीचे म्हणणेही खरे असू शकते. बहुमताचे म्हणणे नेहमीच सत्य असते असे नाही. बहुमतामध्ये एकाच बाजूचा विचार होतो. सर्वसहमतीमध्ये दोन्ही, किंवा सर्वच बाजूंचा विचार होतो. विरोध करणाऱ्याला तो विरोध करतो म्हणून शत्रू समजू नये. तो खरा मित्रच आहे. पुढे जाऊन लोकांनी कोठल्याही खड्ड्यात पडून धोका होऊ नये म्हणून तो इशारा करीत असतो. त्याने विरोध केल्यामुळे बाकीच्यांना विचार करण्यासाठी डोके चालवावे लागते. त्यामुळे सत्य काय, असत्य काय हे समोर येते आणि तेथे विरोधाभास राहत नाही. एक सत्यच फक्त राहते. लोक एकमेकांपासून दूर न जाता जवळ येतात. एकमेकांची ओळखही होते. जे एकमेकांना शत्रू समजत होते ते मित्र बनू शकतात, व त्यांच्या एकत्र मिळून केलेल्या कामातून इतरांना मार्गदर्शनही मिळू शकते.

(२) मेंढा (लेखा) गावात सर्व काम झालेले आहे, अशी आमची समजूत नाही. पुष्कळ कामे अजून अपूर्ण आहेत.

- ठरवलेल्या काही गोष्टी झाल्या, पण काही गोष्टी झालेल्या नाहीत. उदा. गावसमाज सभेत प्रत्येक कुटुंबातून एक पुरुष व एक स्त्री उपस्थित राहिले पाहिजेत असे ठरले आहे, परंतु अजूनही १००% उपस्थिती राहत नाही.
- एखादे काम ठरवितात की अमुक वेळेच्या आत करायचे, पण तसे होत नाही.

- जंगल-गस्त काही लोक प्रामाणिकपणे घालतात, पण काही लोक प्रामाणिकपणे घालत नाहीत.
- जंगल आपले आहे असे सगळ्यांना वाटत नाही. जंगलातून वस्तू आणून वापरणे, आपली गरज भागवणे हाच मुख्य विचार आहे. बाकी जबाबदारी सगळे स्वीकारीत नाहीत. दुसऱ्याने करावे व आपण फायदा घ्यावा, अशीच काहींची वृत्ती आहे.
- गाव फंडातून धान्य आणि पैसे ज्याला पाहिजेत तो सकाळपासून येईल बैठकीत, तर संध्याकाळपर्यंत बसेल. रात्री बैठक झाली तर रात्रीही बसेल. पण पैसा किंवा धान्य मिळाले की त्या दिवसापासून बैठकीला येणार नाही, बाईला पाठवेल किंवा मुलाला किंवा मुलीलाही पाठवेल – असेही कित्येकदा घडते. विचार करण्यात सगळे नेहमी सहभागी होतातच असे नाही. पैसे व धान्य मिळाले की तेवढ्यानेच त्यांचे समाधान होते. मनमोकळेपणाने काही लोक बोलत नाहीत, त्यामुळे त्यांच्या गैरसमजुती तशाच राहतात.
- काही लोक गावसमाज सभेकडून पैसा व धान्य कर्ज घेतात, पण अडचण नसतानाही वेळेवर परत करीत नाहीत. त्यांची मानसिकताच तशी असते. असे लोक पुढे गावालाही अडचणीत आणतात. चांगले प्रामाणिकपणे देणारे लोकही मग त्यांच्यामुळे बहकतात. ते देत नाहीत तर आम्ही कां द्यावे, असा विचार करतात.
- त्यावर उपाय म्हणून आता गावसमाज सभेने असा निर्णय घेतला आहे की गावसमाज सभा सरळ व्यक्तीला कर्ज देणार नाही; बचत गटाला देईल. व्यक्ती तिच्या बचत गटाला मागेल व बचत गट गावसमाज सभेला मागेल. गावसमाज सभेला कर्ज परत करण्याची जबाबदारी बचत गटाची राहील. या पद्धतीमुळे आधी बचत गटात सहभागी नसलेलेही सहभागी होत आहेत.
- महिला समूहात बसतात, पण त्यांच्यातून अजून नेतृत्व समोर आलेले नाही. बोलताना एक तर सगळ्याच बोलायला लागतात, नाहीतर बसून फक्त ऐकतात. बोलणारे पुरुष असले तर काही गप्प होऊन जातात. सतत म्हणावे लागते की बोला, बोला.
- युवक मंडळ एकत्रित आले आहे, परंतु आपले युवकांचे मुद्दे ठामपणे मांडत

नाहीत. चुपचाप राहतात. त्यांना काय पाहिजे, काय नको ते कळत नाही. त्यामुळे काहीजण व्यसनाकडे वळून त्याआधीन होतात.

- लग्नाच्या वेळेला कधी कधी बाहेरगावचे लोक मुलीची वरात आणतात तेव्हा सोबत दारूही घेऊन येतात. काही युवक त्याला बळी पडतात. छोट्या बाटल्यांतून विदेशी दारू आणतात व लपूनछपून पितात. पण प्यायल्यानंतर ते कळतेच.
- गोटूल नावाने ओळखतात, पण कामाने ओळखत नाही व अजूनही समजलेले नाही. घर बांधले, पण काम सुरू नाही झाले.
- एका लग्नाच्या शेवटी आढावा घेताना युवकांनाही सहभागी करून घेतले. तेव्हा ते बोलले की मोठेच पितात, म्हणून आम्ही पितो !
- युवक व महिलांना सहभागी करून घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न करीत नाहीत. त्याची काय गरज आहे, अशी पुरुषी मानसिकता आहे. पण एकदा प्रयत्नपूर्वक सहभागी केले तर त्याचा परिणाम पुढच्या लग्नात दिसला. युवक अजिबात दारू प्याले नाहीत.

आमच्यावर विश्वास ठेवू नका. तसे केल्यास फसल्याशिवाय राहणार नाही. स्वतःवर विश्वास ठेवा. जो स्वतःवर विश्वास ठेवत नाही तो दुसऱ्यावर विश्वास ठेवू शकत नाही. जो स्वतःचे काम करीत नाही, दुसऱ्याचे करतो म्हणतो, तो स्वतःही फसतो व दुसऱ्याला आणि समाजालाही फसवतो. त्यातून दोघांचे व समाजाचेही नुकसान होते.

ऐका सर्वांचे, सगळीकडे पहा, पण दुसरे करतात म्हणून तसे करण्याचा प्रयत्न करू नका. आपल्या गावाच्या व स्वतःच्या हितासाठी गावसमाज सभेत सर्वसहमतीने निर्णय होईल तेच करा ! चुकत-माकत, धडपडत मेंढा पुढे जात आहे. लोकशक्ती एका मर्यादेपर्यंत उभी करण्यात; आणि ती पुढेच जावी, मागे जाऊ नये म्हणून काळजी घेण्यात यशस्वी झाले आहे, त्यामागे ही निर्णय-पद्धतीच सर्वांत महत्त्वाचे कारण आहे.

००० 

## 'वृक्षमित्र' ची अन्य प्रकाशने :

* आपण आपला मार्ग शोधू या
* स्वशासनाची दिशा
* निस्तार हक्क : जगण्याचा अधिकार
* ग्रामवन
* ग्रामवन (हिंदी)
* **Village Forest**
* सहभागी वन-व्यवस्थापन

आगामी –

* सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया
* **Consensus Decision-Making**
* वनाधारित शाश्वत विकास
* समृद्ध जीवनासाठी जैव-विविधतेचे व्यवस्थापन
  *(ले. माधव गाडगीळ)*
* **Mendha (Lekha)**

दिल्ली-मुंबईत आमचे सरकार !

आमच्या गावात आम्हीच सरकार !!



वृक्षमित्र

चंद्रपूर/गडचिरोली